
# बुद्धिबळ आणि झब्बू

**( दोन अंकी नाटक )**

चं. प्र. देशपांडे



# बुद्धिबळ आणि झब्बू

**( दोन अंकी नाटक )**

**-- चं. प्र. देशपांडे**

**अंक पहिला**

पडदा उघडण्यापूर्वी फक्त खालील संवाद ऐकू येतात. संवादांच्या मधे-मधे श्रेयनामावली सांगितली जाते. संवाद पुढीलप्रमाणे : --

चकोर : पल्लवी ऽ ए पल्लवी ऽ ऽ

पल्लवी : अरे, तू ! चकोर !

दोघेही : इकडे कुठे ?

पल्लवी : आपण मॉलमधून बाहेर पडतोय आणि दोघांच्याही हातांत पिशव्या आहेत --

चकोर : ते आहेच गं -- या भागात कशी काय ? -- असं म्हणायचं होतं मला --

पल्लवी : इथे जवळच राहतो आम्ही --

चकोर : पाचेक वर्षांनी भेटतेयस !

पल्लवी : तीनचारच असतील रे !

चकोर : कॉलेजात असताना तू रोज दिसायची सवय होती ना ! ती बंद पडल्याच्या दु:खानं मला जरा जास्त वाटत असतील वर्षं !

पल्लवी : हं --

चकोर : पण आहेस तशी आहेस हं तू --

पल्लवी : म्हणजे ?

चकोर : म्हणजे हेच -- सुंदर वगैरे गं --

पल्लवी : सुंदर वगैरे ?

चकोर : अगं, एखादीला ' सुंदर ' म्हटलेलंही आवडत नाही, असं होऊ शकतं -- फोटो ॲट्रॅक्टिव्ह आहे तुमचा -- एवढंही न आवडणाऱ्या असतात -- तुझं नाहीय ना तसं ?

पल्लवी : म्हणण्याच्या पद्धतीवर असतं रे ते --

चकोर : मला तू हँडसम म्हणालीस समजा तर मला प्रॉब्लेम का यावा, हेच कळत नाही मला --

पल्लवी : ( स्वत:शी -- ) मी कशाला म्हणू ? आगीत तेल ओतायला ? !

चकोर : अं ? काय ?

पल्लवी : पुरुषांना नसतोच हा प्रॉब्लेम -- यात समानता वगैरे काही आलेली नाही --

चकोर : लग्न झालेलं दिसतंय !

पल्लवी : हो --

चकोर : चल, निघू का -- तुलाही कामं असतील --

पल्लवी : तसं काही नाही रे --

चकोर : मला वाटलं, तू गडबडीत असशील --

पल्लवी : अरे, घरीच चाललेय -- इथे जवळच आहे आमचा फ्लॅट -- भेटलोच आहोत तर जा ना बघून --

चकोर : नको, अचानक कोण कुठला आला, असं नको व्हायला --

पल्लवी : अरे, आम्ही दोघंच असतो आणि आलोकना नोकरीवरून यायला बराच वेळ आहे अजून --

चकोर : अच्छा ! चल मग ! -- पण काहीही असो, छान मेंटेन केलंयस तू स्वत:ला -- तीच फिगर, तेच हास्य -- मोहक -- चालतं ना तुला असं मनातलं खरं -- चांगलं बोललेलं ? !

पल्लवी : यात काय एवढं विचारायचं -- चल --

चकोर : तुझं ओझं थोडं मी शेअर करतो -- आण --

पल्लवी : असू दे रे --

चकोर : नाही नाही -- आण इकडे -- ( इथे पडदा उघडतो -- )

( सुशोभित दिवाणखाना.
चकोर देसाई -- २६ -- आणि पल्लवी आलोक -- २५ -- प्रवेश करतात. कुलूप उघडून कडी काढल्याचा आवाज येतो आणि नंतर ती दोघं आत येतात. )

पल्लवी: ( किल्ली अडकवून ठेवत -- ) ये, ये ना ! बस ! हे आमचं घर. लग्न होऊन दोनच महिने झालेत. मी सुध्दा नीट रुळायचीय अजून या घरात.

चकोर: मस्त आहे. छान आहे. बरं झालं आपण त्या मॉलमध्ये भेटलो ते. कॉलेजातल्या ओळखीला आज उजाळा मिळाला.

पल्लवी: हो ना रे ! सगळ्याच जुन्या ओळखी काळाच्या पडद्याआड गेल्या तर आपल्यालाही बरं नाही वाटत.

चकोर: काय करतात म्हणालीस मिस्टर तुझे ?

पल्लवी: अजून कुठे काय म्हणाले मी ? मी तजेलदार झालेय, एनर्जेटिक वाटतेय हेच तर चाललं होतं तुझं ! ते सीआयडी इन्स्पेक्टर आहेत. शिवाय त्यांच्या कॉलेजात ते बॉक्सिंग चॅम्पियन होते.

चकोर: बाप रे ।

पल्लवी: का बरं ?

चकोर: नाही, बॉक्सिंग ऊर्फ मुष्टियुध्द म्हणजे जरा भयानकच वाटतो तो खेळ. पाहतो नं आपण टीव्हीवर. पहिले काही राउंडस् कुणाचाच खास असा टोला बसत नाही. टेन्शनमुळं आणि तिरक्या पायांवर उड्या मारून घामाघूम होतात नुसते. मग त्यातलं एखादं खूप थकतं. त्याचा फायदा घेऊन मग दुसरं त्याला दणादण हाणून काढतं. मला तर तो दमात उखडून हाणायचा खेळ वाटतो. पण काय गं, पुढं काही डेव्हलप नाही केलं वाटतं त्यांनी ? ऑलिम्पिकला वगैरे काही कुठं दिसले नाहीत ?

पल्लवी: छे रे ! असे खूप असतात बॉक्सर, सगळे थोडेच ऑलिम्पिकला जातात ?

जयदीप: स्वभाव रागीट आहे का ?

पल्लवी: छे रे ! तसं काही नाही.

चकोर: पण काय गं, या लोकांना केस अगदी बारीक ठेवावे लागतात का ?

पल्लवी: ते नाही मला माहीत. हल्ली तसे भांगबिंग पाडण्या इतपत ठेवतात ते केस.

चकोर: आणि नाकाचं हाड ? मी असं ऐकलं होतं की या लोकांचं नाकाचं हाड काढलेलं असतं म्हणून ? पण नुसतं कातडं कसं काय राहणार हाडाशिवाय ?

पल्लवी: ते नाही माहीत. अगदी पुढं जाणारे काढत असतील हाड वगैरे. हे काही इतके पुढं गेले नाहीत. नाकाचं हाड आहे. दातसुध्दा आहेत.

चकोर: अच्छा ! तरीपण जरा भीतीदायकच असेल ना त्यांचं व्यक्तिमत्व ? दरारा टाईप ?

पल्लवी: तसं काही नाही.

चकोर: जाऊ दे ! भेट होईलच कधीतरी ! साखरेचं वर्णन करून साखर थोडीच कळते !

पल्लवी: आत्तासुध्दा थांबलास थोडा वेळ तर येतीलच ते.

चकोर: पण काही असो, एक सांगतो मी तुला, आता बऱ्याच दिवसांनी बघितलं ना मी, म्हणजे बघ, जे आहे ते आहेच पण शिवाय बराच फरक पडलाय तुझ्यात ! म्हणजे तुझ्यासारखी एखादी नटी असेल नं तर तिला मादक सौंदर्याचा ॲटमबॉंबच म्हणतील लोक !

पल्लवी: ए, काहीतरीच काय ? इतकी आकर्षक दिसतेय मी ?

चकोर: माझ्या मनात तर तुला डोकावून पाहता येणार नाही ! म्हणून सांगावं लागतंय मला !

पल्लवी: म्हणजे इतका काय फरक पडलाय बाई ! ते तरी सांग.

चकोर: आता तू जुनी मैत्रिण आहेस म्हणून सांगायला हरकत नाही पण एखाद्या स्त्रीच्या शरीराची डोळ्यांत भरलेली वैशिष्ट्यं सांगणं म्हणजे याला कुणी असभ्यपणाही म्हणून शकेल.

पल्लवी: असभ्यपणा कसला रे ! आणि बोलायचं टाळलं तरी वाटायचं ते वाटतच असतं नं !

चकोर: पण असं वस्तुस्थिती समजणाऱ्या स्त्रिया कितीशा असतात ? जनरली असं गृहीत धरून चाललं जातं की सगळा सभ्यपणाच आहे. आणि मग अशा वेळी सभ्यपणाच्याच लेव्हलवर राहावं लागतं.

पल्लवी: तू असं बोलतोयस की जणू काही सभ्यपणा ही काहीतरी एक वाईट गोष्ट आहे.

चकोर: नाही नाही, सभ्यपणा चांगलाच, पण खरेपणा त्याच्याहून चांगला एवढंच !

पल्लवी: तूही मजेशीर झालायस ! बोलण्याच्या ओघात विषय शिताफीनं टाळलास ! माझ्यात पडलेल्या फरकाचा !

चकोर: अगं नाही ! तुझ्याशी कसली शिताफी ! छे छे ! सांगतो नं ! अच्छा ! तसं तर फार तपशील सांगावे लागतील. आणि सांगता येतीलही मला. म्हणजे अगदी केसांपासून पायांपर्यंत. पण इतकं बारकाईनं मी तुझ्यात रस घेणं तुला कसं काय वाटेल हा प्रश्नच आहे. त्यामुळं फक्त मुख्य मुख्य सांगतो. आणि या विषयातलं फक्त मुख्य मुख्य सांगतो म्हटल्यावर मी काय सांगणार आहे ते तुला कळलंही असेल.

त्यामुळं एवढंच सांगतो की स्वत:च्या स्त्रीत्वाची जाणीव आणि स्त्रीत्वाचा अभिमान आता तुझ्या डोळ्यांत अतिशय स्पष्ट आणि तीव्र झालेला आहे.

पल्लवी: हुशार आहेस. प्रत्येक गोष्टीकडं तुझं लक्ष असूनसुध्दा कडेकडेनं निसटून गेलास.

चकोर: तसं तर तुझ्यासारखी स्त्री समोर असेल तर निसटून जाण्यापेक्षा सापडणं आणि निसटता न येणंच मी पसंत करीन. पण तुझे पतिदेव बॉक्सर आहेत हाच एक मुद्दा जरा ठळक वाटतोय मला. ( ती हसते. ) हसू नकोस. बॉक्सर लोकांना थोडासा मोकळेपणा कळतो की नाही, त्यांना विनोदबुध्दी किंवा थोडीफार छेडछाड, हसणं कळतं की नाही हे खरंच मला माहीत नाही. उलट तू आणि एक बॉक्सर ही जोडी कशी काय जमली असेल असाच विचार येतोय सारखा माझ्या डोक्यात.

पल्लवी: का ? बॉक्सर काय माणूस नसतो ?

चकोर: नाही, माणूस असतो -- पण तसं तुझंही बरोबरच आहे म्हणा. कारण जनरली तुझ्यासारख्या सुंदर स्त्रिया या तगडे आणि शारीरिक ताकदवालेच नवरे करतात -- कारण त्यांना नवराही हवा असतो आणि बॉडीगार्डही हवा असतो. मनाच्या प्लेनपेक्षा शरीराच्या प्लेनवर जास्त जगणारे लोक जास्त पझेसिव्ह असतात. आणि बॉडीगार्ड तगडा आणि पझेसिव्ह असल्यावर तुझ्यासारख्या स्त्रियांना काळजीच नाही. आता मीसुध्दा तुझ्या नवऱ्याला अजून बघितलेलं नाही आणि आपली जुनी ओळख आहे म्हणून एवढं बोलतोय, नाहीतर कोण फंदात पडतंय असल्या ! पण एक प्रश्न विचारू का ?

पल्लवी: विचार नं !

चकोर: विचार म्हणण्यापूर्वी विचार कर. कारण मी जो प्रश्न विचारणार आहे तो अत्यंत खाजगी बाबतीतला आहे. कदाचित तुला एकदम मुद्याला हात घातल्यासारखं वाटेल.

पल्लवी: असूं दे, विचार.

चकोर: तुझी अशी परवानगी असली म्हणजे मग हरकत नाही. माझं एक असं मत आहे की मनाची तरलता असल्याशिवाय सौंदर्य त्याच्या सगळ्या सूक्ष्म मार्गांनी जाणवत नाही. जाणवलं नाही की त्याचा पूर्ण आस्वाद आणि आनंद देणं घेणं शक्य नाही. त्यामुळं जनरली सुंदर स्त्रियांचं आयुष्य हे ट्रॅजिक असतं असं मला वाटतं. कारण त्या ज्या प्रकारचे पती निवडतात त्यांना सौंदर्यातलं कितपत कळत असेल, मला शंका आहे. त्या सुरक्षित राहतात, त्यांना मुलंबाळंही होत असतील, पण स्वत:चं सौंदर्य उपेक्षित राहिलं याची खंत बाळगूनच त्यांना जगावं लागतं. एक निव्वळ उत्सुकता म्हणून विचारतोय, तुझा काय अनुभव आहे ?

पल्लवी: आत्ताशी तर आमची सुरुवात आहे. तुझ्या प्रश्नाचं उत्तर नीट देण्याइतकी मी अनुभवी थोडीच आहे ?

चकोर: राजकारण्यांसारखी उत्तरं देता येण्यासाठी राजकारणीच असलं पाहिजे असं काही नाही, हेच खरं .

पल्लवी: यात कसलं आलंय राजकारण ? ज्याचं मला खरोखर उत्तर देता येईल असा दुसरा कुठलाही प्रश्न विचारून बघ.

चकोर: म्हणजे एक प्रकारचा शंकासमाधानाचा कार्यक्रमच होईल हा. कोणत्या प्रकारच्या पिकाला कोणतं खत किती प्रमाणात कधी लागतं -- असलं होणार हे सगळं. पण हरकत नाही. खरोखरच दुसरी एक शंका आहे मला. विचारू का ?

पल्लवी: मजेशीरच आहेस तू. विचार नं.

चकोर: प्रत्येक वेळी मी परवानगी का घेतोय, कारण तुला असं वाटू नये की, मी अधिकाधिक तुझ्या जवळ यायचा प्रयत्न करतोय म्हणून.

पल्लवी: मी तुला संभाषणचतुर ही पदवी द्यायला तयार आहे.

चकोर: सुंदर स्त्रीनं दिलेली पदवी ही शंकराचार्यांनी दिलेल्या पदवीपेक्षा मी मानाची समजतो. पण नुसती पदवी देऊन काय उपयोग आहे ?

पल्लवी: मग आणखी काय हवंय ?

चकोरचे मन : च्यायला, ' आणखी काय हवंय ? ' म्हणजे खूप अडथळा होणार नाही, असं वाटतंय -- विनोद चालतायत -- पतिदेव ही जणू काही एक वस्तू असल्यासारखं केलेलं वर्णन चालतंय -- आणि माझ्या प्रश्नांबद्दल उत्सुकता ! क्या बात है ! अजून काय हवंय !

चकोर: ( क्षणभराने -- ) नाही, सध्या नुसतं शंकासमाधान ! तर माझा पुढचा प्रश्न हा जनरल नसून फक्त तुझ्याबद्दल आहे. तुझी परवानगी गृहीत धरून मी आता मुद्याला हात घालतो. काही स्त्रियांना, अनेक स्त्रियांचा अनुभव असलेल्या पुरुषाचं आकर्षण वाटतं, काही स्त्रियांना असं वाटतं की आपल्याव्यतिरिक्त स्त्री म्हणजे काय हे त्याला माहीतही असू नये -- म्हणजे तो पूर्णपणे आपल्यातच बुडालेला असावा -- आणि स्त्रियांची तिसरी कॅटेगरी अशी असते की तो या दोनपैकी कुठल्या कॅटेगरीतला आहे हे आपल्याला माहीत असायची गरज नाही असं त्यांना वाटतं. तू यांतल्या कुठल्या कॅटेगरीत येतेस ?

पल्लवी: असे असतात होय तीन प्रकार ?

चकोर: मी काही शास्त्रज्ञ नाही. पण मला आपलं वाटतं की संभाषण पुढं न्यायला चांगलं आहे की नाही हे ?

पल्लवी: तुझा हा प्रश्न नुसता नवरा या पुरुषाबद्दल असला तर ठीक आहे. पण तसं नसलं तर हे एक मोक्याचं जाळंच आहे. उत्तर दिलं रे दिलं की पडलेच मी अलगद जाळ्यात ! कारण मग तो नवरा नसलेल्या पुरुषाबद्दलचाही ठरेल प्रश्न !

चकोर: असं काही नाही. या प्रश्नाची व्याप्ती तुझ्या इच्छेवर आहे. तू काहीही मनात समज आणि उत्तर दे.

पल्लवी: सॉरी. मी धोका पत्करू इच्छित नाही. शिवाय यांची यायची वेळही होत आलीय.

चकोर: एक मानसशास्त्रज्ञ -- बहुतेक फ्रॉईडच असेल -- काय म्हणाला होता माहीत आहे का -- विवाहपूर्व सेक्स हवाच म्हणे -- नाही तर घरात एखादं वाद्य वाजवून बघणाऱ्याला एकदम एखाद्या ऑर्केस्ट्रॉत वाजवायला सांगितल्यासारखं होतं --

पल्लवी : त्याचा काय संबंध इथं ?

चकोर : यावरून मला काही तरी बोलायचं होतं, पण विसरलो --

पल्लवी : हं --

चकोर : हं -- आठवलं -- आपण सवयीनं हे बरोबर, ते चूक -- हे जे धरून चालतो, ते बरोबर असतंच असं नाही -- हे सांगायचं होतं, बहुतेक -- त्याला !

पल्लवी : हं --

चकोर : ( काही क्षणांनी -- ) आणि दुसरं -- तू बघ -- तत्त्वज्ञ, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनियर, कलावंत, चार्टर्ड अकौंटंटस, सरकारी किंवा इतर ऑफिसातले अधिकारी, इव्हन व्यापारी -- यांतलं कुणी कधी बॉक्सिग चॅम्पियन असू शकतं का ? का नाही ? तर त्यांना मनाचं फील्ड हे शरीराच्या फील्डपेक्षा बरंच मोठं आणि सूक्ष्म ठेवायची गरज असते.

पल्लवी: बरं मग ?

चकोर: काही नाही. बऱ्याच दिवसांनी भेटलोय आपण तर मला तुझ्या आयुष्याचं चित्र समजून घ्यायची उत्सुकता आहे, इतकंच.

पल्लवी: पण हा विषय मघाशी झाला होता एकदा. मला तर असं वाटतंय की आल्याआल्या तू यांच्याविरुध्द

निवडणुकीचा अर्ज भरून उभा राहतोयस. आता फक्त तुमची दोघांची चिन्हं काय आहेत ते सांगून टाक. समज मला वाचता येत नाही.

चकोर: कमाल करतेयस. पण हरकत नाही. समज तुझ्या नवऱ्याचं चिन्ह हत्ती आहे आणि माझं कबूतर.

पल्लवी: बॉक्सिंग न करता यांना हरवावं आणि आपण हरलोय हेही त्यांना कळू नये असा खेळ दिसतोय मला तर यात.

चकोर: म्हणजे माझं शंकासमाधान करायच्या ऐवजी आता तूच शंका घेतेयस.

पल्लवी: तसं नाही रे. उलट मला तर आनंद झालाय तू भेटलास त्याचा. शिवाय तुझं बोलणंही ऐकायला मस्त वाटतं. तुझा आवाज आणि बोलण्याची पध्दत अशी आहे की गुंग होऊन जावं ऐकणाऱ्यानं. आणि तू डोळ्यांत बघून बोलतोस तेव्हा तर इतकं छान वाटतं !

चकोर: मग हरकत नाही. तुझ्या मनात माझ्याबद्दल जी एक पूर्वीची इमेज आहे ती तशीच राहावी असं मला वाटतं. उगीच आपलं बोलण्याच्या ओघात, अनवधानानं, ती इमेज बिघडून काय उपयोग आहे ?

पल्लवी: नाही रे ! तसं काही नाही ! आणि इमेजेस कसल्या रे !

चकोर: पण तसं काही खटकलं तर सांग लगेच. पुढं मग एक क्षणसुध्दा थांबणार नाही मी.

पल्लवीचे मन : कॉलेजात असल्यापासून हा असाच आहे -- पण त्या वेळी ती एक मजा -- गंमत होती -- आताही हे वाटतंय चांगलं, पण सावध राहावंच लागेल --

पल्लवी: तसं होणारच नाही पण.

चकोर: मग ठीक आहे. ( काही क्षणांनी -- ) तुझ्या अंगावरची साडी मस्त दिसतीय. सॉरी. जरा चुकीचं बोललो मी. राग नाही ना आला ?

पल्लवी: का ? यात काय चुकीचं आहे ?

चकोर: नाही, अंग आणि साडी यांचा वेगवेगळा उल्लेख केला म्हणून मला वाटलं चुकलं की काय !

पल्लवी: काहीतरीच. असं म्हणायची पध्दतच असते. पण तुझ्या मनात अशा वेगळ्याच घडामोडी का होतात ते तुझं तुलाच माहीत.

चकोर: मला खरं म्हणजे दुसरंच म्हणायचं होत -- विशेषत: हे असं गोलागोलांचं डिझाइन असलं नं की साडी नेसण्याच्या पध्दतीमुळं ते गोल कुठंही येऊ शकतात. कुठंही आले तरी ते करेक्टच वाटतं, हे कसं काय ? पण तुझे तर करेक्टच आलेत म्हणा. तर हे आपोआप नकळत करेक्ट आलेत की मुद्दाम लक्षपूर्वक आणलेत ?

पल्लवी: हा मात्र जरा चावटपणा आहे तुझा.

चकोर: तरी पण ?

पल्लवी: मला नाही माहीत .

चकोर: घर छान आहे पण तुझं. फर्निचर, रंगसंगती मस्त आहे. तुझी असणार निवड सगळी.

पल्लवी: नाही. यांची एक बहीण इंटिरिअर डेकोरेटर आहे. तिनं सुचवलंय सगळं.

चकोर: मग बरोबर आहे.

पल्लवी: काय बरोबर आहे ?

चकोर: मी जो विचार केला तो ! त्यांचं -- तुझ्या मिस्टरांचं नसणार ! मी काय म्हणतो पल्लवी, तुम्ही हे पुढचं दार कायम उघडंच ठेवता का ?

पल्लवी: नाही. मी एकटी असले तर बंद असतं. माझी एखादी मैत्रिण माझ्याबरोबर असली तरी बंद असतं.

आम्ही दोघं असल्यावरही बंद असतं. पण आता तू आहेस घरात इथं माझ्याबरोबर. आता जर दार बंद असलं आणि ते आले तर त्यांना सहन होणार नाही. तू म्हणतोस तसे जरा पझेसिव्ह टाईपच आहेत ते. म्हणून मी मुद्दाम उघडं ठेवलंय.

चकोर: सरळ साधं वागताना सुध्दा किती विचार करावे लागतात माणसाला ! खरंच ।

पल्लवी: आपोआप होतं ते. विचाराचा खास असा त्रास घ्यावा नाही लागत.

चकोर: तेच. मी मघाशी म्हणत होतो त्याचा पुढचा भाग तुला सांगायचा राहिला. मी तुझी खोडी काढतोय असं न समजता ऐक. सुंदर स्त्री ही बहुधा मनानंही सुंदर आणि तरल असते. तिच्या मनाच्या गरजा, तिनं निवडलेला तगडा पती काही समजू शकत नाही. तिच्या मनाचा कोंडमारा होतोय हेही त्याला समजत नाही. मग तिला दोन फ्रंटवर खेळावं लागतं. एकतर त्याच्यामुळं आपलं रक्षण होतंय असं लीन राहणं आणि दुसरं म्हणजे आपल्या मनाच्या कोंडमाऱ्यातून मोकळं होण्याचे मार्ग शोधत राहणं. पण ती फक्त एकाच म्हणजे पहिल्याच फ्रंटवर फक्त आहे असं पतीला वाटत राहण्याची काळजी तिला घ्यावी लागते. या प्रकारात बिचारीचं सौंदर्य लौकर कोमेजण्याचा धोका असतो. कारण भयानक पझेसिव्ह पती तिनं स्वेच्छेनं निवडलेला असतो. आणि मनानं तिचं सौंदर्य फुलवण्याची, खेळवण्याची त्याला समज नसते. म्हणूनच फार सुंदर, आकर्षक स्त्रिया या जनरली जरा दुर्दैवीच असतात. ज्या गोष्टीचं रक्षण होतंय त्या गोष्टीचा संपूर्ण आविष्कार कधीतरी व्हायला हवाच नं ! नुसतंच रक्षण ! स्वत:च्या सौंदर्याचा आनंद, तिचा तिला, जो पुरुषाच्या माध्यमातून मिळाला पाहिजे, तो तिला मिळू शकत नाही.

पल्लवी: आता मात्र तुला माझी दया येतीय की मला मार्गदर्शन करायचा तुझा प्रयत्न चाललाय याचा जरा विचारच करावा लागेल.

चकोर: स्त्रीला मार्गदर्शन करणारा पुरुष म्हणजे एक तर वेडा असू शकतो किंवा स्त्रियांची काहीच माहिती नसलेला असू शकतो. आणि दयेचं म्हणशील तर स्त्रीनं मनात आणलं नं तर दयनीय राह्यची तिला अजिबात गरज नसते. आपले मार्ग आपण चोखाळणं तिच्या सहजपणे हातात असतं. तिला अवघड काहीच नसतं.

चकोरचे मन : एवढं तर रिस्क घ्यावं लागणारच -- थोडीही हिंट न देता बोलत राहण्यात पॉइंटच काय मग ? अशा रिस्कनंतर एक तर संभाषण कट होऊ शकेल किंवा अधिक उत्साहात पुढे जाईल -- ती कशी प्रतिक्रिया देतेय यावर आहे --

पल्लवीचे मन : तो म्हणतोय ते बरोबर आहे पण जरा चावटपणाकडे झुकायला लागलाय तो -- मलाही ते छान वाटत असलं तरी एवढ्यात ? इतकं ?

पल्लवी: उगीच काहीतरी विचार भरवू नकोस माझ्या डोक्यात. खरं तर मला, आपल्या वेळी कॉलेजात असलेल्यांपैकी कोण कुठं आहे, काय करतात, कुणी तुला भेटलं होतं का, यात जास्त इंटरेस्ट आहे.

चकोर: तुला इंटरेस्ट असलेलं काहीही बोलू. मी तुझ्या सहवासात असेपर्यंत तुला आनंद वाटत राहणं हे मला फार महत्त्वाचं वाटतं.

पल्लवी: म्हणजे तुझ्या मनात समज जे काही आहे तिथनं अजिबात लक्ष ढळू देणार नाहीस तू.

चकोर: ( पाहतो. जवळ येतो.) कुठल्याही प्रक्रियेत हळूहळू तीव्रता निर्माण होणार असते. पण मधेच तो विषय ढिला सोडला तर मग पुन्हा सुरुवात होईलच याची खात्री नसते. म्हणून हे असं आवश्यक असतं. आपलं चित्त अविचल राहिलं म्हणजे दुसऱ्याचंही राहतं आणि प्रक्रियेत खंड पडत नाही. सुरुवात झालेली गोष्ट खंड न पडता चालू राहिली तर ती योग्य दिशेनं जातेच. त्याचा वेगळा विचार नाही करावा लागत.

पल्लवी:	म्हणजे हेही तू स्त्रीच्या बाबतीतच म्हणतोयस का ?

चकोर:	याचं उत्तर महत्त्वाचं नाही. नुसती ही शंका ठेव मनात. आता माझ्या मनात काय चालवायचं याला तर तुझी परवानगी घ्यायची आवश्यकता नाही. आणि तू इतकी सुंदर आणि आकर्षक असल्यावर काही ना काही घडणारच मनात !

पल्लवी:	म्हणजे मला न विचारता मनानं वाट्टेल ते खेळ करणार तू माझ्याशी !

चकोर :	खरं तर बाहेरसुध्दा परवानगी विचारणं चूकच आहे. थोडीथोडी अधांतरी सुरुवात करायची. म्हटलं तर असं, म्हटलं तर तसं -- अशी. फक्त ही अशा प्रकारची सुरुवात आहे असं त्या स्त्रीला जाणवावं इतपत धाडस ठेवायचं. तिला आवडत असेल तर तीही त्या धूसरपणात सामील होते आणि धूसरपणा असला तरी ती सामील होतेय हे कळावं अशी थोडी बेफिकिरी किंवा मुद्दाम आणलेला अजाणतेपणा ठेवते. बास ! मग धूसरपणा स्पष्ट व्हायला वेळ लागत नाही ! काही काही वेळी तर सगळा स्पष्टपणासुध्दा त्या धूसरपणातच जगून होतो !

पल्लवी:	या क्षेत्रातला इतका सूक्ष्म अभ्यास करायचा तर तुझ्या वकिली पेशाचा अभ्यास होतो की नाही ?

चकोर:	त्याचंसुध्दा एक तत्त्व आहे. कुठल्याही एका क्षेत्रात सूक्ष्मपणा आणि व्यासंग असलेलं मन दुसऱ्याही एखाद्या क्षेत्रात त्याच कार्यक्षमतेनं काम करू शकतं. कारण आयुष्यातल्या बारकाव्यांचं एक लॉजिक त्याला समजलेलं असतं.

पल्लवी:	हे सगळं माझ्याशी बोलताना तुला अडखळायला नाही होत ? म्हणजे बोलावं की नको असं ?

चकोर:	एकतर मी हळुवारपणा सोडलेला नाही. आणि मोकळेपणानं बोललेलं तुला चालतं, म्हणजेच तुला ते आवडतं, हे वेगळं सांगायची गरज नाही.

पल्लवी:	स्त्रीचं मानसशास्त्र या विषयावर तुझा बराच अनुभव आणि चिंतन दिसतंय. तू एखादं पुस्तक का नाही लिहीत या विषयावर ?

चकोर:	पुस्तक ल्याह्यचं म्हणजे त्या शास्त्राच्या प्रगतीचा ऐतिहासिक आलेख आपल्या दृष्टीपुढं पाहिजे. मला त्यात इंटरेस्ट नाही. शिवाय समजलेलं सांगण्यापेक्षा समजून घेत राहण्यातच मला जास्त इंटरेस्ट आहे. मनुष्य हा आयुष्यभर एक विद्यार्थीच असतो, असं मी मानतो.

पल्लवी:	माझ्याबद्दल तुला काय समजलंय ?

चकोर:	' समजलंय ' असा पूर्णविराम नकोच. समजून घेत राहणं. आणि समजून घेत राहणं, हे कितीही भेटींमधून चालू राहू शकतं.

पल्लवी:	लबाड आहेस. म्हणजे तू वारंवार भेटावंस ही माझी इच्छा तुला कळल्याचं आडमार्गानं सांगून टाकलंस !

चकोर:	दोघंही जेव्हा आडमार्ग वापरायला लागतात तेव्हा ते आडमार्ग राहातच नाहीत. अगदी ढळढळीत राजमार्ग होतात.

पल्लवी:	तुझ्या मते ही जी काही तत्त्वं आहेत त्यांना तू अगदी शास्त्रीय सत्यं समजून चालतोयस. पण मनाच्या वागण्याच्या शक्यता अगणित असतात. सगळं हे असंच असतं किंवा असलं पाहिजे असं काही नाही.

चकोर:	होतं नं असं कधीकधी. एखादं तत्त्व खोटं पडतंय असा अनुभव यायला लागतो. मग तत्त्व बदलून पाह्यचं. नवीन काही शिकायला मिळतंय का ते पाह्यचं. तेही जमलं नाही तर सध्या आपण हिच्या इंटरेस्टच्या कक्षेत येत नाही असं समजून व्यावहारिक नीतीमत्तेच्या लेव्हलवर राहून विषय सोडून द्यायचा. पण असं फार कमी वेळा घडतं. आपण जर स्त्रीत्वाला मनापासून तीव्रपणे महत्त्व देत असलो तर कुठलीही स्त्री जनरली अशा मनाचा अपमान करत नाही.

पल्लवीचे मन : त्याच्या बोलण्याची येतेय मजा पण -- पण -- मजा येतेय हे कळू दे त्याला -- तेवढं तर कळणारच – पण फार पुढे नाही जाऊ द्यायचं --

पल्लवी: म्हणजे बहुसंख्य स्त्रिया चवचाल असतात असं तुझं म्हणणं !

चकोर: नो, नो, नो ! बहुसंख्य स्त्रिया या स्वत:च्या स्त्रीत्वाला महत्त्व देणाऱ्या असतात. आणि चवचाल कधी म्हणायचं ? व्यावहारिक चौकटींची बंधनं त्यांनी मोडली तर ! पण तसं त्या करत नाहीत. दोनदोन, तीनतीन फ्रंटवर खेळण्याच्या बाबतीत स्त्रियांचा पटाईतपणा अगाध असतो. गुप्तपणाची खात्री असेल आणि समोरचा पुरुष योग्य वेळी संयमही पाळू शकणारा असेल तर स्त्री फार सराईतपणे वागू शकते.

पल्लवी: हे जर सगळं तुझं ज्ञान प्रसृत करायचं ठरवलं तर समाज अनीतीमान होऊन जाईल.

चकोर: तसं काही होत नाही. समाज हा नेहमी नीतीमानच असतो आणि नीतीमानच राहतो !

पल्लवी: नुसता चावटपणा आहे हा !

चकोर: नाही. तसं नाही. कुठलंही लेबल न लावता अनुभवानं शिकण्याची वृत्ती ठेव. असं सूक्ष्मपणानं वागायची गरज माणसानंच काळाच्या ओघात तयार केलेली आहे. समाज नीतीमान ठेवण्यासाठीच हा सूक्ष्मपणा चालू असतो. प्रत्येक वेळी स्त्री शरीरानंच सामील झाली पाहिजे, असं काही नसतं. नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

पल्लवी: पण हे सगळं मला सांगायचं कारण ?

चकोर: कारण विचारण्यापेक्षा ऐकावंसं वाटतंय की नाही ते सांग.

पल्लवी: हे पेचात पकडणं झालं मग.

चकोर: एकदा मोकळेपणा ठेवायचा म्हटलं की पेचात पकडणंही आलंच नं त्यात.

पल्लवी: तू तुझा मुद्दा सोडणार नाहीस. विषयाची गोडी निर्माण केलीस पण तू माझ्यात. तरी एक गोष्ट माझ्या लक्षात आलीय. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू समजतोस तू.

चकोर: अर्थात् ! आणि स्त्रीलाही ज्या ज्या गोष्टीचं सुख, आनंद वाटतो ती ती गोष्ट तिच्या बाबतीत उपभोग्यच असते. ज्या ज्या गोष्टींचं सातत्य आपल्याला आवडतं ते ते सगळं उपभोग्यच असतं. उदाहरणार्थ आपलं आयुष्य ! उपभोग्यच ! आपलं स्वत:चं सातत्य टिकवण्यासाठी आपली धडपड असते. म्हणजे आपण स्वत:ही स्वत:ला उपभोग्यच ! एखाद्या गोष्टीचं आपल्याला सुखं होतं, तिचं सातत्य आवडतं पण ती गोष्ट उपभोग्य नाही असं एखादं उदाहरण दे तू !

पल्लवी: तू सगळ्या गोष्टींना अनपेक्षित कलाटणी देतोस. मजा येते.

चकोर: नुसता सहवास जरी म्हटला तरी, सुख वाटलं नाही तर प्रश्नच येत नाही; पण सुख वाटलं तर उपभोग्यपणा आलाच. एका वेगळ्या प्रकारे तो मित्रा-मित्रात किंवा मैत्रिणी-मैत्रिणीतही असू शकतो. पण, मित्र आणि मैत्रीण, किंवा स्त्री आणि पुरुष असं म्हटलं की हा एक पदर त्याला येणारच -- नाकबूल केलं तरी.

पल्लवी: हा विषय तर एकूण फारच गहन दिसतोय. शिवाय तुझी तपस्याही दांडगी दिसतेय याच्यात. पण मी म्हणते यात असं असून असून किती ज्ञान असणार आहे ?

चकोर: तू जेवढा सूक्ष्मपणा दाखवशील आणि या गहन विषयात उत्सुकता दाखवशील तेवढं यात अधिकाधिक खोल जाता येतं, हे दाखवून देऊ शकेन मी तुला. गाण्यांना संगीतकार चाली देतात. आपल्याला वाटतं आता चाली संपून जातील. असून असून किती शक्यता असणार आहेत चालींच्या ? पण नवीनवी गाणी निर्माण होतच राहतात. प्रत्येक गाण्याला नवी चाल असू शकते.

पल्लवी: तुझी चाल वाकडी वाटतेय पण मला जरा.

चकोर: वाकड्या वळणानं जाणारी वळणदार चाल तर जास्तच खुबीदार असते. पण तुला खटकत असेल तर सांग. मी आपला जातो.

चकोरचे मन : हा एकदम टेस्टच घेण्याचा डायलॉग आला ! बघू तर --

पल्लवी: थांब रे ! जाशील !

चकोर: पण एक लक्षात घे. मी जेवढा पुढाकार घेतोय तेवढा तुझा नाहीय अजून. तू सुरक्षितच राहतेयस. माझा मोकळेपणा तुला चालतोय हे एक ठीक -- पण तुझ्या बाजूनं कुठाय मोकळेपणा ?

पल्लवी: म्हणजे काय ?

चकोर: हे शास्त्र स्त्रियांना उपजत माहीत असतं. सगळं कळतंय तुला.

पल्लवी: तुला असं स्त्रियांना सिड्यूस करणं अनैतिक नाही वाटत ?

चकोर: समाजाला अनैतिक वाटतं म्हणजे मलाही वाटणं भागच आहे.

पल्लवी: किती झाल्या असतील आत्तापर्यंत ?

चकोरचे मन : आयला ! इतका डायरेक्ट विषय ! मी फारच एफिशियंट झालोय का काय !

चकोर: तुला धरून सांगू की तुला सोडून ?

पल्लवी: मलाही धरण्याइतपत झालीय प्रगती ?

चकोर: हा संवाद आपल्यात होऊ शकतोय म्हणजे बघ.

पल्लवी: काय बाई तरी ! किती दिवसांनी भेटलोय आपण ! आणि कुठल्या विषयावर बोलत बसलोय !

चकोर: तुझ्या कपाळावर उजव्या बाजूला जो तीळ आहे नं तो उत्कृष्ट बुध्दिमत्तेचं लक्षण आहे.

पल्लवी: म्हणजे हाही अभ्यास आहे तुझा ?

चकोर: हो. या तुझ्या बुध्दिमत्तेतून जे भाग्य उदयाला येणार आहे त्याचे तपशील कळायला शरीरावर इतरत्र कुठंकुठं तीळ आहेत ते पाहावं लागेल.

पल्लवी: मी सांगितलं तर चालेल का ?

चकोर: नाही. तसं नसतं ते. प्रत्येक तिळाचा आकार, रंग या सगळ्या गोष्टींना अर्थ असतो.

पल्लवीचे मन : ठीक आहे -- होऊ द्यावं त्याच्या मनासारखं थोडं -- मजा तर येतेय -- पण अडवावं --

पल्लवी : तुला दाखवायला काहीच हरकत नाही रे ! पण आता यांची यायची वेळ झालीय ! त्यांना वाटायचं की तुझा दुसराच काहीतरी उद्देश आहे.

चकोर: ठीक आहे. पुन्हा कधीतरी. आपल्या जुन्या ओळखीला उजाळा मिळालाच आहे; आता यातून मैत्री, स्नेह, सुख आपोआप येईल.

पल्लवी: इतकं मस्त वाटलं पण. अरे असं मनमोकळेपणानं बोलणारं कुणी भेटतच नाही.

चकोर: माझ्यासारखे असतात लोक पण त्यांचे ब्रेक्स फार टाईट असतात. अपघाताला फार घाबरतात ते. एखादवेळी होऊही शकतो अपघात, पण अपघातच होईल असं गृहीत धरून वागू नये, असं मला वाटतं -- आपण काहीतरी धोका पत्करतोय अशीसुध्दा भावना असायचं कारण नाही. आता समज आपल्यात आपुलकी वाढू शकते, जवळीक वाढू शकते -- हे सगळं, मी जर आधीच करकचून ब्रेक लावून ठेवला असता तर कसं कळालं असतं ? ( तिच्या खांद्यावर हात ठेवून -- ) तुला सांगतो, तुझ्या डोळ्यांतल्या तीव्र स्त्रीत्वानं मला अगदी घट्ट पकडून ठेवलं आहे. हा नजरेच्या स्पर्शाचा परिणाम. पण प्रत्यक्ष स्पर्श असतो त्याचेसुध्दा इतके हजारो प्रकार आहेत की काही विचारू नकोस ! एखाद्या ख्याल गायकीसारखं सुचत जातं एकेक. मैफल द्रुत लयीत कधी गेली ते कळतही नाही.

पल्लवी: ( बाजूला होत -- ) काहीतरीच काय ! आत्ता नको ! वेळकाळ काही आहे की नाही !

चकोर: मस्त ! दुरावा नाहीसा होत जाणं, व्यावहारिक सभ्यतेचे पडदे गळून पडणं हेही अतिशय सुखदायक असतं.

पल्लवी: तुला भीती नाही वाटत ?

चकोर: संगनमतानं जे होतं त्यात पूर्ण निर्भयपणा ठेवायला काही हरकत नसते. एकाची जरी चलबिचल असली किंवा विश्वासाला धक्का लावण्याची शक्यता वाटत असली तरी मग त्या फंदात न पडणं बरं ! दोघांनीही एकमेकांची काळजी घेतली पाहिजे ! काळजी म्हणजे इतकी घेतली पाहिजे की अनुकूल क्षण येईपर्यंत धीरानं वाट पाहता आली पाहिजे. एखादवेळेस अनुकूल क्षण कधीच येणार नाही. पण अनुकूल क्षणाव्यतिरक्त कधीही काहीही घडता कामा नये. कारण यात संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होण्याचा धोका असतो. या बाबतीत समोरच्या व्यक्तीची पूर्ण काळजी घेणं हे पाहिलं उद्दिष्ट आणि जमेल ते जमवणं हे दुसरं उद्दिष्ट, असंच फक्त असू शकतं. अर्थात् या सगळ्यात तरीही एक किमान धोका पत्करावा लागतोच. तेवढा मात्र पत्करला पाहिजे.

पल्लवी: माझं जर विद्यापीठ असतं ना तर डॉक्टरेट दिली असती मी तुला. या विषयावरची भगवद्गीताच आहे तुझ्याकडे.

चकोर: मला समाधान आहे -- तू असं म्हणालीस याच्यातच.

पल्लवी: पण एखादी स्त्री अनुकूल आहे की नाही हे तुला कसं कळतं ?

चकोर: खरं म्हणजे हे सगळं उघडपणे बोलायचं नसतं. ते होऊ द्यायचं असतं आणि समजायचं असतं. पण हरकत नाही -- ज्ञानामुळं अधिकाधिक सूक्ष्मपणा येतो. सगळ्या पध्दती अधिकाधिक गुंतागुंतीच्या आणि सुंदर होत जातात. असं होत जाणं यालाच संस्कृती म्हणतात. त्यामुळं बोलायलाही हरकत नाही. मुख्य म्हणजे स्त्री अशा वेळी ॲट्रॅक्टिव्ह दिसायचा प्रयत्न करते. चाणाक्ष नजरेला सगळं कळतं. जाणकार नजरेचा माणूस ते आपल्याला कळल्याचं स्पष्ट दाखवतो. उदाहरणार्थ केसांची बट मागे सारत राहणे, पदर सावरत राहणे, स्वत:च्याच अंगावरून हात फिरवत राहणे, अनवधानानं, समोरचा पुरुष कसं बघतोय तिकडं आपलं लक्ष नाही असं दाखवणे आणि नकळत त्याला तसं बघू देणे, अनवधानानं स्पर्श होऊ देणे, जरा वेळ पदर बाजूला झाला तरी न सावरणे आणि बघू देणे, जाणीवपूर्वक केस वा वेणी पुढे घेणे, केस मागे बांधण्यासाठी किंवा विंचरताना दोन्ही हात उंच मागे घेऊन समोर येणे आणि एकूण फिगर पाहू देणे वगैरे पुष्कळ प्रकार असतात. न बोलता नुसतं समजून घेत राहणं फार मस्त असतं.

पल्लवी: असले प्रकार घडले तरी प्रत्येक वेळी स्त्रीचा असाच उद्देश असतो असं काही नाही.

चकोर: निसर्गत:च आकर्षकपणा ठेवण्याकडे स्त्रीचा कल असतो. आणि उद्देश असेलही आणि नसेलही -- हीच तर यातली मजा असते. समजणारा समजतो. आणि समजणारा समजतोय की नाही इकडे स्त्रीचं लक्ष असतं. तसं लक्ष असल्याचं लक्षात आलं की बेधडक तिच्याकडे पाह्यला हरकत नसते. पण अर्थात् या खेळातली बेसिक काळजी घेऊन !

पल्लवी: मग अशा प्रकारचं मी कायकाय केलं आत्तापर्यंत ? मला खरंच माहीत नाही.

चकोर: तुला माहीत नाही असंच मीही समजून चालायला तयार असल्यावर काय प्रश्न येतोय ?

पल्लवी: फार हुशार आहेस तू. सूक्ष्म तंतूंनी वळसे घालून ठेवल्यासारखं वाटतं. तू असं करतोयस हे त्यावेळी कळतही नाही. आणि कळतं तेव्हा आपल्यालाच ते आवडायला लागलेलं असतं.

चकोर : पल्लवी, तू फेसबुकवर आहेस की नाहीस ?

पल्लवी : आहे ना --

चकोर : प्रोफाईलमध्ये फारशी माहिती दिली नसशील --

पल्लवी : कशावरून ?

चकोर : नाही तर माझ्या कॉलेजग्रुपमध्ये दिसली असतीस ना !

पल्लवी : अरे, जेवढ्यास तेवढं ठेवलं तरी येतातच कुणी ना कुणी -- ' काय चाललंय पल्लवी ? कशी आहेस ? ' – असं म्हणत --

चकोर : तेवढं तर होणारच --

पल्लवी : पण तुला फ्रेंडरिक्वेस्ट पाठवीन मी --

चकोर : हं, हेच बरोबर होईल -- मीही पाठवू शकतो तुला रिक्वेस्ट -- पण होतं काय, पुरुषानं रिक्वेस्ट पाठवणं म्हणजे लंपटपणा होतो, स्त्रीनं पाठवणं हा सभ्यपणा ! स्त्रीप्रधान मानसिकता सगळी !

पल्लवी : वा !

चकोर : सत्वर कर हे काम -- पण पल्लवी, मलाही तुझ्याशी बोलावं असं वाटणारच हं !

पल्लवी : तुझं ठीक आहे रे ! माहितीचा आहेस तू !

चकोर : तरी, पल्लवी, ज्यांच्याशी बोलावं, असे दोनचार तरी असतीलच ना फ्रेंडस --

पल्लवी : तेवढे आहेत रे ! पण आपण बोलूच की !

चकोर : एका वेळी आम्ही तिघे बोलू लागलो तर तुझी धावपळ होईल -- या चौकटीचं वाक्य त्या चौकटीत जाणार नाही याची काळजी घे म्हणजे झालं ! पण अशा तुटक्या बोलण्याचं समाधान नाही होत --

पल्लवी : तुझ्याशी बोलताना मी तिकडे ऑफलाईन असेन, बास ? !

चकोर : हं ! हे छान ! ये है मेरा बहुमान !

पल्लवी : तुझं झालं होतं का असं कधी -- या चौकटीचं वाक्य चुकून त्या चौकटीत ?

चकोर : छे, छे – एके काळी केलं थोडं चॅटिंग, पण आता नाही – वेळ वाया जातो त्यात. माझ्या एका कवी मित्राचं एक इंटरेस्टिंग निरीक्षण आहे एकूणच चॅटिंगबद्दल – ते सांगतो – तो काय म्हणतो की हल्ली लोकांनी भाषा आणि विचार या गोष्टींकडे दुर्लक्षच केलेलं आहे – त्यामुळे बोलावं काय हेच त्यांना सुचत नाही – त्यामुळं एकदम ते ' मी तुझं चुंबन घेतोय ' किंवा ' मिठीत घेतोय ' – हीच लेव्हल गाठतात आणि ते बायकांना नाही चालत – बाहेर कितीही पॉप म्यूझिक असलं तरी इथे शास्त्रीय संगीतच लागतं ! नोमतोम, रागविस्तार -- हे सगळं पद्धतशीर व्हावं लागतं -- आणि त्याला अनेक भेटीही लागू शकतात -- तेवढा वेळ द्यावाच लागतो ! -- तुला आले असतील ना अनुभव ? असले ? --

पल्लवी : इतकं नाही रे बोलणं होत माझं कुणाशी -- मुळात मी घाबरतेच जरा -- कुणी ब्लॅकमेलब्लिकमेल केलं तर ? आणि आलोक हे असे ! वाटच लागायची !

चकोर : हं -- ते आहे -- पण आपण बोलू -- ठरलं ! -- आजच फ्रेंड व्हायचं !

पल्लवी : नक्की --

चकोर : पल्लवी, छान वाटलं ! ..... बरं, ते जाऊ दे, पल्लवी, आता बघ हं, माझा आणि तुझा पाय असे समोरासमोर आहेत. माझा जरा अर्थातच काळसर दिसतोय तुझ्यापुढे. पण नुसतं बघून सांग की माझ्या पायाची लांबी तुझ्या पायापेक्षा किती जास्त असेल ?

पल्लवी: एक्झॅक्टली नाही सांगता येणार. अंदाजे सांगीन.

चकोर: बरं, आपण पाय जवळजवळ लावून ठेवू -- ( तसं करून -- ) आता ?

पल्लवी: तुझा पाय जरा पुढे घे -- बरोब्बर माझ्या अंगठ्याच्या टोकापासून ठेव -- हं -- आता बरोबर आहे --

चकोर: सांग.

पल्लवी: आधी तू सांग.

चकोर: नाही, आधी तू !

पल्लवी: बरं बाई -- थांब हं -- नीट बघू तर दे -- ( चटकन उठून लांब जात -- ) नको बाबा, उत्तर भलतंच येईल याचं --

चकोर: आत्ता नको, हे बरोबर आहे तुझं. पण योग्य वेळी जर हे भलतंच उत्तर निघालं तर ते भलतंच न वाटता सर्वात समाधानकारक उत्तर वाटेल.

पल्लवी: एका भेटीतच केवढा पल्ला झाला असं वाटतं !

चकोर: कारण तुझी समज फास्ट आहे.

पल्लवी: ए, पण सगळे तीळ दाखवणार आहे मी एकदा तुला -- मग मात्र त्यांचे अर्थ सांगावे लागतील तुला.

चकोर: का नाही !

पल्लवी: नुसतं बोलूनसुध्दा -- थकवा येतो नाही !

चकोर: तुझ्या विश्रांतीच्या वेळी नेहमी माझा विचार कर.

पल्लवी: तू कुणाकुणाचा करतोस विचार ?

चकोर: एका वेळी एकच, आणि आता तर फक्त तुझाच.

पल्लवी: पण एक लक्षात ठेव, मला तुझ्याबद्दल आपुलकी वाटतेय याचा अर्थ माझ्या नवऱ्याबद्दल ती कमी झालीय असं नाही.

चकोर: तसं होऊही नये ! तरच तो निश्चिंत राहू शकेल ! बॉक्सर तर विशेषत: निश्चिंतच राहिला पाहिजे. नाहीतर फार विध्वंस होऊ शकेल.

पल्लवीचे मन : जणू काही माझा नवरा परका आणि आम्हीच दोघे खरे एकमेकांचे -- असं बोलतोय -- पण तेवढं दुर्लक्ष करावंच लागणार --

पल्लवी: बायको कशी आहे तुझी ?

चकोर: छान आहे --

पल्लवी: तिला भेटायचंय एकदा. ओळख होईल.

चकोर: मी जशी तुझी काळजी घेतोय तशी तुलाही माझी काळजी घ्यायचीय हे लक्षात ठेव.

पल्लवी: ती तुला फसवत असेल असं तुला कधी वाटत नाही ?

चकोर: वाटतं नं ! अगदी शक्य आहे ! पण अशी मला शंकासुध्दा येऊ नये असं आत्तापर्यंत तरी वातावरण आहे.

पल्लवी: समजा ती तुला फसवतेय असं कळलं तर ?

चकोर: नाशच होईल ! खेळाचे नियम कुणीच मोडायचे नसतात !

पल्लवी: म्हणजे तुझं कौशल्य मला जितकं माहीत आहे तितकं तिला बिचारीला काहीच माहीत नसेल !

चकोर: कोण बिचारं आहे ते कसं कळणार !

पल्लवी: तू एका मैदानावर हुतुतू खेळत असतोस आणि त्याच वेळी दुसऱ्या मैदानावर क्रिकेट खेळत असतोस.

चकोर: नाही. एका मैदानावर झब्बू आणि दुसऱ्या मैदानावर बुध्दिबळ ! तिचं जरा वेगळंच आहे सगळं ! अजून मला प्रॉब्लेमच वाटतो सगळा ! ही नीतीमत्ता म्हणायची की ट्रिक म्हणायची की भोळेपणा म्हणायचा ते मला अजून कळलेलं नाही. पण एकूणात बायका असतातच हुशार.

पल्लवी: म्हणजे तुझं काही वाईट मत नाही तिच्याबद्दल ! म्हणजे चांगलंच ना !

चकोर: नाही, म्हणजे चांगलं असं नाही. या एकूण प्रकारातल्या एका वेगळ्याच टोकावर जाऊन ती उभी असते सतत. तिला कुठल्याच विचारानं पकडता येत नाही.

पल्लवी: विचारानं काय पकडायचं ! संसार चांगला करायचा म्हणजे झालं ! बरं, नाव काय तिचं ?

चकोर : कामिनी.

पल्लवी: कामिनी ! -- छान आहे की नाव !

चकोर: मी कुठं नाही म्हणतोय ! छान आहे !

पल्लवी: म्हणजे इनडायरेक्टली, प्रॉब्लेम आहे काहीतरी !

चकोर : म्हटलं तर किरकोळच ! आता ऑफिसात तिचा कुणीतरी एक जयकुमार नामक सहकारी आहे, त्याच्याबरोबर ही कधीकधी कॉफी प्यायला हॉटेलात जाते. आणि सांगतेही मला ते सगळं ! ते सगळं मला सांगणं, ही सरळपणा दाखवायची एक ट्रिक पण असू शकते ना ! आता या बाबतीत सतत मनात एक संशयाची पाल चुकचुकत असते. पण हे बोलणं क्षुद्रपणाचं आणि मागासलेपणाचं ठरू शकतं !

पल्लवी: मग काय करतोस या बाबतीत ?

चकोर : ए, हा नको विषय ! आपलं चाललंय तेच चालू दे ! ( बाहेर मोटरसायकलचा आवाज येतो. )

पल्लवी: हं, आता सगळंच बास ! तुझ्या धंद्यातलं काहीतरी सांग ! हे आले !

चकोर: मी घरबांधणीसंबंधीच्या सगळ्या केसेस घेतो. जमिनीचे कायदे, घरबांधणीचे कायदे, भाडेकरू कायदे, को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे कायदे यांत माझं स्पेशलायझेशन आहे. तसं सगळं सेट असतं. अशा केसेस आपोआप येतात. शिवाय एक जाहिरात फर्म आहे माझी. ( आलोक ठाकूर - २८ - येतात. ) हे आणि वकिली यांवर मस्त चालतं माझं. ( ठाकूरांकडे लक्ष जाते. )

पल्लवी: हे माझे मिस्टर -- आलोक.

चकोर: नमस्कार.

पल्लवी: हा माझा कॉलेजातला मित्र चकोर देसाई.

आलोक: नमस्कार.

पल्लवी: एका मॉलमध्ये अचानक भेट झाली आमची. म्हटलं घरी चल. तुमचीही ओळख होईल. ( उठते.) मी चहा करते हं. ( जाते. )

आलोक: ( बसत -- ) तुम्हाला इथं येऊन किमान एक तासभर तरी होऊन गेलेला आहे हे मी सांगू शकतो.

चकोर: ते कसं काय ?

आलोक: ही कुठं आहे, ती कुठं आहे, हा काय करतो, तो काय करतो, इत्यादी जर तुमची बोलणी झालेली नसती आणि तुम्ही नुकतेच आलेले असता तर हे सगळं बोलून झाल्याशिवाय ती चहा करायला गेली नसती.

चकोर: तुम्ही खरे हाडाचे सीआयडी आहात.

आलोक: आणि आता चहा आणल्यावर जर का तिनं ही कुठं आहे आणि तो कुठं आहे वगैरे चालू केलं तर याचा अर्थ तुमचं दुसऱ्याच कुठल्यातरी विषयावर इतका वेळ बोलणं झालेलं आहे.

चकोर: म्हणजे कुठल्या विषयावर ?

आलोक: ( हसून -- ) एकमेकांची चौकशी, विचारपूस करत बसला असाल.

चकोर: म्हणजे तुम्ही हजर नसताना एखाद्या ठिकाणी काय झालं असेल याचे बरेचसे अंदाज करू शकता तुम्ही !

आलोक: ऑफ कोर्स ! तुम्हाला वाटत असेल की आमचं पोलिसी डोकं आहे आणि शिवाय बॉक्सिंगची आवड – हिनं सांगितलंच असेल ! -- पण डिपार्टमेंटमधे थोडक्या काळात आपलं नाव आहे. असो. तुम्ही काय करता ?

चकोर: मी वकील आहे आणि शिवाय माझी एक जाहिरात फर्म आहे.

आलोक: कसल्या जाहिराती करता ? लोणची, मसाले, पापड की टूथपेस्ट, टीव्ही, वॉशिंग मशीन ?

चकोर: निरनिराळ्या. येतील त्या.

आलोक: एक सांगू का ?

चकोर: सांगा नं.

आलोक: तुमच्या चेहऱ्यावर जो साळसूदपणा आहे नं तसा क्वचित् बघायला मिळतो. यू मस्ट बी ए व्हेरी ट्रिकी पर्सन. आणि असा बनेलपणा तुमच्या वकिली पेशाला आवश्यकच आहे म्हणा.

चकोर: ( स्मित करून -- ) ही मी स्तुती समजायची की निंदा समजायची ?

आलोक: नाही. फक्त वस्तुस्थितीचं वर्णन समजायचं.

( पल्लवी चहाचा ट्रे घेऊन येते. )

चकोरचे मन : आयला काय बोलतेय आता ही ? ! हा पुरता फाडणार आता मला ! माझ्या मनातून डायरेक्ट तिला मेसेज पोचवता यायला हवा होता !

पल्लवी: ए, आपल्या वेळचे कॉलेजातले कोणकोण भेटतात, काय करतात - काहीच सांगितलं नाहीस अजून तू मला. स्वप्ना सप्रे, पाटील, माणिक, तुम्ही ज्याला सहस्त्रबुध्दू म्हणायचा तो सहस्त्रबुध्दे --

चकोर: ( आलोक सस्मित आपल्याकडे बघताहेत हे पाहून -- ) आता आमच्या बोलण्याचा विषयच ओळखून टाका एकदम म्हणजे झालं !

पल्लवी: म्हणजे काय ?

चकोर: मला इथं येऊन किमान एक तास होऊन गेला असेल, हे आधीच ओळखलं होतं यांनी !

पल्लवी: चल् ! तू काय गुन्हेगार म्हणून आलायस का इथं ?

आलोक: मी हातानं वीट फोडू शकतो आणि विचारानं काळ भेदू शकतो.

चकोर: म्हणजे भेदिले सूर्यमंडळा ! ( हसतो. )

आलोक: दासबोधातलं आहे ना हे ?

चकोर: मारुतीस्तोत्रातलं आहे. जाहिरातीसाठी आम्हाला अशी निरनिराळी माहिती ठेवावी लागते.

आलोक: म्हणजे लिहिलं कशासाठी आणि त्याचा उपयोग काय चाललाय !

चकोर: ( रिलॅक्स होत -- ) तसे आपण काळाचे गुलाम असतो.

आलोक: तीळ आणि त्यांचे अर्थ या विषयाचा तुमचा थोडाफार अभ्यास असावा असं मला वाटतं --

चकोर: कशावरून ?

आलोक: बोलताबोलता माझ्या उजव्या तर्जनीवरच्या तिळाकडे तुम्ही निरखून पाहिलंत !

चकोर: तुम्ही म्हणजे कॉम्प्युटरच आहात. क्षणाक्षणाला काही ना काही टिपतच जाता तुम्ही !

आलोक: शिवाय ! स्त्रियांच्या बाबतीत तुम्ही जरा --

चकोर: म्हणजे ?

पल्लवी: ए, काय हे ?

आलोक: डिस्टर्ब होऊ नका. तुमच्या शुक्र उंचवट्यावर जाळी आहे. मी माझ्या कामाला उपयोगी पडेल म्हणून मधूनमधून हस्तरेषांचा अभ्यास केला होता. तुमचं तुमच्या बायकोशी पटत असण्याची शक्यता फार कमी आहे. कारण ज्याला स्वत:च्या वागण्याबद्दल गुप्तता ठेवावी लागते तो इतरांबद्दल संशयी आणि सावध असतो.

पल्लवी: ए, उगीचच काय ?

चकोर: म्हणजे भविष्य बिविष्य सांगता का काय ?

आलोक: नाही ! वर्तमान ! ( काही क्षण गप्प. )

पल्लवी: का गप्पसे झालात !

आलोक: नाही, मी मघाशी सहज जेव्हा ओळखलं की यांचा तिळांचा अभ्यास असावा तेव्हा यांच्या डोळ्यांत थोडं गिल्ट दिसलं मला आणि त्यांनी लगेच तो अपराधी भाव झटकून टाकला. तर याचं कारण काय असावं, याचा विचार करत होतो. बहुतेक तुमच्या बोलण्यात हा विषय येऊन गेला असावा किंवा तुझ्या कपाळावरचा उजव्या बाजूचा तीळ पाहून यांनी मनात काहीतरी विचार केला असावा.

चकोर: म्हणजे हळूहळू मला वाटतं माझ्या जन्माच्या वेळी माझ्या वडिलांची आर्थिक परिस्थिती कशी होती, हेही सांगू शकाल तुम्ही !

आलोक: वाईट होती । जे पहिल्यापासून चांगल्या वैभवसंपन्न कुटुंबात वाढलेत त्यांच्या तोंडी जन्माच्या वेळची आर्थिक परिस्थिती असा विषयच यायचं कारण नाही.

पल्लवी: जाऊ दे ! उगीच त्याला नर्व्हस करू नका. त्याला काय करायचंय असली सीआयडीगिरी शिकून !

आलोक: ऑलराईट ! बी इन्फॉर्मल ! दुसऱ्या काही गप्पा मारू आपण !

चकोर: हे अवघड आहे पण ! आम्ही आपलं नॅचरली काही बोलत, वागत राह्यचं आणि यांनी ते टिपून दुसरंच काहीतरी ओळखत राह्यचं ! माणसाची स्वत:च्या डोक्यातली प्रायव्हसीही राहणार नाही अशानं !

आलोक: अहो, पण ज्याला काही लपवायचं आहे त्याला ही काळजी ! तुमचा काय प्रश्न आहे !

चकोर: तरीसुध्दा आपल्या अंतरंगापर्यंत पोचायचा प्रयत्न करणारा मनुष्य समोर असणं म्हणजे डिस्टर्बच होतो माणूस !

आलोक: हे कबूल आहे मला. या माझ्या सवयीमुळं माझ्या सहवासात बरेचजण डिस्टर्ब होतात. प्रत्येकाला काही ना काही सवय असते ना, तशी कारणमीमांसाच येते हो माझ्या डोळ्यांपुढे ! बरं, जाऊं दे ! ते कोण काय करतं, कुठं असतं ते सांगायचं राहिलंय तुमचं, ते सांगा हिला, तोपर्यंत मी जरा फ्रेश होऊन येतो. ( जातात. )

चकोर: काय माणूस आहे ! ते आत गेले तरी आपल्यावर टेलिस्कोप बसवून गेलेत असं वाटतं !

पल्लवी: तसं काही नाही रे ! ( कपबशा उचलून आत जात -- ) आलेच हं ! ( जाते. चकोर अत्यंत अस्वस्थ बसून. किती वाजले ते पाहतो. ते गेले त्या दिशेकडे पाहतो. मग उठतो. पुन्हा बसतो. पुन्हा हातावरच्या घड्याळात पाहतो. पुन्हा आलोक गेलेल्या दिशेकडे पाहतो. )

चकोरचे मन : च्यायला ! कुठल्या फंदात पडलो असं झालंय ! आपण अंतर्बाह्य नंगे उभे आहोत असं वाटतंय, तिच्या मायला ! ( काही क्षणांनी आलोक फ्रेश झालेले येतात -- हातात शिलगावलेली सिगरेट. )

आलोक: अरे ! तुम्ही काही बोललातच नाहीत वाटतं ! ही कुठं गेली ! ?

चकोर: ती कपबशा घेऊन गेली आत.

आलोक: याचा अर्थ काय असावा बरं ? ( विचार करत राहतात. )

चकोर: अवघड आहे ! असह्य आहे हे ! नॉर्मल लाईफ असं असूच शकणार नाही तुमच्या अवतीभंवती !

आलोक: नॉर्मल लाईफचं पाहू नंतर. पण एक माहिती सांगतो तुम्हाला. माझं न् हिचं लग्न फार झटपट झालं. का माहितीय ? आमच्या चुकीमुळं लग्नाच्या आधीच हिला दिवस गेले म्हणून ! पर्सनल असलं तरी तुम्ही काही परके नाही म्हणून सांगतोय ! हिच्याशी लग्न करून हिला बायको म्हणून संभाळणं कठीण आहे हे मला माहीत होतं ! पण आय हॅव ॲक्सेप्टेड द चॅलेंज ! शिवाय असं तिला सोडून देणंही चांगलं

नव्हतं ! शिवाय तशी ती ॲट्रॅक्टिव्ह आहेच ! आणि शिवाय किरकोळ काहीतरी कुठं काय घडत नाही ? आणि शिवाय दुसऱ्या कुणाची तरी खात्री तरी कोण देऊ शकतं ? आणि शिवाय आपल्या स्वत:च्या सावधपणाबद्दल थोडाफार आत्मविश्वास पाहिजेच ! हे तरी का ? तर समाजासाठी. अहो, समाजाशिवाय जगू शकतो का आपण ? आपण आहे याचा अर्थच समाजही आहे ! ही स्वत: तशी भयंकर सूक्ष्म आहे ! आता मलासुध्दा ते चॅलेंज वाटतं म्हणजे बघा तुम्ही ! पण माझ्या सावधानपणामुळं शेवटी ती हिस्टेरिक वगैरे होऊ नये म्हणजे झालं ! आणि झाली तरी काय करणार ! समाजात राह्यचंय आपल्याला ! अपमान नको ! मग त्यासाठी बायको हिस्टेरिक झाली तरी ते पत्करावं लागणारच ! ज्यांचे संसार सुखाचे होतात ते लोक जनरली सावध नसतात, असं एक माझं मत आहे. त्यामुळं फार सुखी संसाराची मी अपेक्षाच ठेवलेली नाही !

चकोर: मी तर समजत होतो की तुम्हाला बॉक्सिंगची आवड आहे !

आलोक: ( हसून -- ) वॉक्सिंगची आवड आहेच । ती तर फार जुनी आवड आहे माझी ! आणि मला बॉक्सिंगची आवड आहे एवढंच तुम्ही समजत असाल, हेही ओळखलं होतं मी !

चकोर: ते कसं काय ?

आलोक: माझ्या इतर गोष्टी कळत चालल्यावर तुमच्यावर होणार परिणाम बघून !

चकोर: तुमचे सगळे अंदाज खरेच असतात असं वाटतं तुम्हाला ?

आलोक: अंदाज हे जोपर्यंत अंदाज असतात तोपर्यंत खरे असण्याचा कुठं प्रश्न येतो ? ती एक शक्यता धरून चालायचं असतं.

चकोर: कमाल आहे !

आलोक: यात तशी कमाल वगैरे नसते. मनाची एखादी क्वालिटी वाढवण्याचा हा एक प्रकार असतो. आता आणखी एक उदाहरणार्थ म्हणजे मी आल्यावर काहीतरी चांगल्या गप्पांत खंड पडल्यासारखं वातावरण तयार झालं ! झालं की नाही ? त्यानंतर आणखी काही झालं. काही बोलणं झालं. अशा प्रत्येक वेळी समांतरपणे एक अंदाजांचीसुध्दा साखळी विणली जात असते माझ्या मनात. त्या साखळीला जर सलगपणा यायला लागला किंवा त्याची एक पध्दतशीर गोष्ट तयार व्हायला लागली तर मात्र या सगळ्या अंदाजांची नीट दखल घ्यावी लागते. काही काही वेळी असं होत नाही. मग ते अंदाजांचे तुकडे वायाही जाऊ शकतात. पण तरीही अंदाज करणं हे एक माझं वैशिष्ट्य आहे.

चकोर: डेंजरस आहे पण हे ! चुकून जर का गोष्ट तयार झाली तर समोरच्या माणसाची भरलीच मग !

आलोक: अहो नम्रपणानंसुध्दा गळा कापणारे लोक मला माहीत आहेत ! ते जास्त डेंजरस असतात !

चकोर: कठीण आहे. ओळख झाल्याझाल्या एकदम सगळं तिरकसच चालू केलंय तुम्ही !

आलोक: ओळख झाल्याझाल्या अशा एकेक गोष्टी स्पष्ट व्हायला लागल्या तर काय करणार ! पण अंदाज कशाला ! माझ्या अंदाजांची टेस्टच घेऊ आपण ! या खोलीत एक टेपिंग मशीन बसवलेलं आहे. पंधरा फुटांच्या परिसरात काहीही आवाज झाले तर ते रेकॉर्ड करतं आणि शांतता असेल तर आपोआप बंद होतं. तुमच्यांत म्हणजे तुम्ही आणि ती यांच्यांत झालेलं संभाषण मी तुम्हाला पुन्हा ऐकवू शकतो. ऐकायचंय ?

चकोर: ( भयंकर नर्व्हस -- ) तुमची इच्छा ! ( पल्लवी येते -- ) पल्लवी, तुझं घर म्हणजे एक टेहळणी आणि तपासणी केंद्रच आहे ! आता आपल्यात झालेलं संभाषण रेकॉर्ड केलेलं ऐकवतो म्हणतायत !

पल्लवी: कसलं काय रे ! ऐकवा म्हणावं ! उगीच लोकांना नर्व्हस करायची सवय आहे यांना ! बघितलंय मी !

आलोक: पण तुम्ही असे हवालदिल का होताय ? अहो घर आहे हे ! आमचे नातेवाईक येतात, मित्र येतात.

त्यांच्यावर असं लक्ष ठेवलं जातंय म्हटलं तर कसं वाटेल त्यांना ? घर म्हटल्यावर लोकांनी विश्वासानं यावं आणि मुख्य म्हणजे विश्वासानं जावं, हे महत्त्वाचं नाही का ?

चकोर: ( रिलॅक्स होत, किंचित हसत -- ) मला मनातनं रागही येत होता आणि तो दाखवणं तर चुकीचं ठरलं असतं. पण लोकांच्या फिरक्या घेण्यात मात्र मानलं पाहिजे तुम्हाला !

पल्लवी: मला तर हे सगळं पोरकटपणाचं वाटतं --

आलोक : पण तुमच्या एक लक्षात आलं असेल की तुमच्या आवडत्या क्षेत्रातसुध्दा हम भी कुछ हैं !

चकोर: कुठलं आवडतं क्षेत्र ?

आलोक: जाऊं द्या, सगळं पोरकटासारखं बोलत बसणं मलाही आवडत नाही.

चकोर: बरं, मी निघू का आता ?

पल्लवी: निघालास ?

आलोक : निघलात ?

चकोर: हो, जातो आता..

पल्लवी: मग परत कधी येणार आता ?

आलोक: निदान वर्षातनं एखादेवेळेला तरी येत जा हो ! नाहीतर असं करा नं -- मिसेसना घेऊन या तुमच्या ! ( पल्लवीला -- ) कशी आहे आयडिया ?

पल्लवी: छान ! ये नं एकदा तिला घेऊन !

चकोर: हो, येईन, पण ती जरा आजारी असते हल्ली ! येऊ ?

पल्लवी: काय होतंय ! बोलला नाहीस ते ?

आलोक: औषधपाणी वेळच्या वेळी करा म्हणजे झालं ! बऱ्या झाल्यावर या घेऊन !

चकोर: बरं, चलतो मी !

आलोक: या, या !

पल्लवी: अरे, तुझा पत्ता नाही दिलास ?

चकोर: हं, हो ! हे माझं कार्ड -- ( तिला खिशातून कार्ड काढून देतो. ) येतो मी --

पल्लवी: अच्छा, ये पण -- बघीन, मीपण तिची तब्बेत वगैरे बघायला येऊन जाईन -- अच्छा !

चकोर: ( बाहेर --) अच्छा ! ( तो गेल्यावर पल्लवी आत येते. आलोक नुसते तिच्याकडे पाहतात. )

आलोक: एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का ?

पल्लवी: ( जरा रागातच -- ) तुमच्या लक्षात येणारं सगळंच मी महत्त्वाचं समजत नाही.

आलोक: त्याच्या शर्टावर लिपस्टिकचा डाग होता आणि तो, तो सारखं लपवायचा प्रयत्न करत होता.

पल्लवी: असेल ! पण माझ्याकडं आलेल्यांशी वागायची ही तुमची पध्दत मला आवडलेली नाही.

आलोक: इथं येण्याआधी तो कुठंतरी जाऊन आला असावा.

पल्लवी: असेल ! पुन्हा कधी यावंसं वाटेल का कुणाला इथं !

आलोक: आणि काय योगायोग पहा -- तुझीही लिपस्टिक विस्कटलेली आहे --

पल्लवी: शक्यच नाही ! काय डोकंबिकं फिरलंय का तुमचं ! संशयाचं भूत झालाय तुम्ही ! स्वत:च्या बायकोचा संशय घेता ! लाज वाटली पाहिजे ! दोन महिनेसुध्दा नाहीत झाले अजून लग्नाला आणि हा संशयीपणा ! शी !

आलोक: संतापू नकोस. आपल्याच हार्टवर परिणाम होतो त्याचा ।

पल्लवी: खड्ड्यात गेलं ते माझं हार्ट ! अवघड आहे तुमच्याशी संसार करणं !

आलोक: हे बघ, जास्त संतापायचं काही कारण नाही. चांगलं वागणाऱ्यांचे संसार सुखाचे होतात कारण ते सावध नसतात. एका व्यक्तीचं वागणं जरा वेगळ्या मार्गानं चालतं तरी दुसऱ्या व्यक्तीला ते कळत नाही कारण ती सावध नसते. मी स्वत: मुळात चांगलं वागणारा नाही. त्यामुळं मी सावध राहणार ! कळलं ? !

पल्लवी: शी ! काय घाणेरडं तत्त्वज्ञान हे ! फसले मी !

आलोक: कुणाला काय बोलतेयस हे जरा लक्षात घेऊन बोल ! माझ्या संयमाची परीक्षा घेऊ नकोस !

पल्लवी: ( आणखी संतापून --) काय कराल ? मारून टाकाल मला ? मारा ! ( आलोक पाहात उभे. ) माझे मित्र, मैत्रिणी माझ्याकडे येणार ! मी असल्या तुरुंगात राहणार नाही ! आणि ऐकून ठेवा ! मला माझा कधीही संशय घेतलेलं चालणार नाही ! चकोर आणि मी इथं घरात असलो आणि दरवाजा आतून बंद असला तरी ! कळलं ? !

आलोक: ( काही क्षण पाहून -- ) बरं, बरं, चल ! जास्त चिडाचिड नको ! बास ! बरं, आता पाणी घेऊन ये जरा मला प्यायला -- ( ती पाहते. संताप थोडा सैल सोडते आणि आत जाते. आलोक बसतात. पाय पसरून रिलॅक्सड् बसतात. काही क्षण जातात....स्वत:शी हसतात.... ) ' नॉर्मल लाईफ ' म्हणे ! मला लाईफ शिकवतोय ! च्यूत्या साला !! .....( अंधार होत जातो...)

**--- अंक पहिला समाप्त ---**

**--- अंक दुसरा ---**

( चकोरचे घर. चकोर त्याच्या पत्नीची वाट बघत येरझाऱ्या घालतो आहे. मोबाईलवरून फोन करून पाहतो. वैतागून फोन ठेवून देतो. काही क्षणांनी लॅपटॉप घेतो आणि चालू करतो. मग फेसबुकवर जातो. हे सगळे समोर स्क्रीनवर दिसते. आता तो चॅटिंगसाठी रचना नामक स्त्रीला बोलावतो. पुढचे संवाद हे चॅटिंगवर घडतात. वाटल्यास रेकॉर्डेड आवाजही वापरावेत. )

चकोर : फ्रेंडशिप-रिक्वेस्ट मान्य केल्याबद्दल धन्यवाद !

रचना : त्यात एवढं विशेष काही नाही हो --

चकोर : आज तुम्ही दिसलात तर चॅटिंगला रिक्वेस्ट करायची, असं मी ठरवलंच होतं --

रचना : अहो, रिक्वेस्ट कशाला हवीय एवढी ? इट इज फ्रेंडशिप --

चकोर : ते आहेच. तुमच्या प्रोफाईलवर काहीच माहिती नाही तुमची -- काय उद्योग-व्यवसाय ?

रचना : मी पोलीस सब-इन्स्पेक्टर आहे !

चकोरचे मन : बोंबला ! हे डिपार्टमेंट हात धुवून माझ्या मागं लागलंय, तिच्यायला !

चकोर : अरे वा ! पण मग एवढी चांगली गोष्ट तुम्ही प्रोफाईलवर का टाकत नाही ?

रचना : अहो, टाकली होती -- पण सगळ्या फक्त स्त्रियांच्याच यायच्या फ्रेंडशिप-रिक्वेस्ट -- आमचं आम्हालाही

काही लाईफ आहे की नाही ?

चकोर : म्हणजे ?

रचना : मित्र -- खाजगी आयुष्य हो ! मी रिक्वेस्ट पाठवल्या तर दोघेतिघेजण फेसबुक खाती बंदच करून गायब झाले !

चकोर : हं, हं !

रचना : ते प्रोफाईलवरनं काढून टाकल्यावर यायला लागल्या मग पुरुषांच्याही रिक्वेस्ट ! नंतर कळलं तर चालतं ! लगेच अनफ्रेंड व्हायलाही घाबरतात मग --

चकोर : मलासुद्धा आदरच वाटायला लागलाय तुमच्याबद्दल !

रचना : फ्रेंडशिप न बिघडवता आदरही वाटू द्या की ! मी कुठे नको म्हणतेय !

चकोर : फ्रेंडशिप न बिघडवता -- म्हणजे ?

चकोरचे मन : हा तर कमीत कमी रिस्क असलेला प्रश्न आहे -- पण तेवढा तरी लागेलच --

रचना : ( स्मायली टाकते. )

चकोर : यानं काय कळणार हो ?

चकोरचे मन : हं -- आलं लक्षात !

रचना : आणि हे असं अहोजाहोची काही गरज नाही --

चकोर : पण तुझ्या पेशाची भीती वाटणारच जरा !

रचना : कशाला ? फ्रेंडशिप याचा अर्थच निर्भय -- नि:संकोच !

चकोर : प्रयत्न करेन मी -- पण बोलता बोलता काही चुकलं तर पंचाईतच होणार !

रचना : म्हणजे ?

चकोर : अगं, तू स्त्री असल्याचं विसरून मला तरी तुझ्याशी बोलता येणार नाही -- खरं तर असं कुणालाच येत नसतं !

रचना : फडके मसाल्यांची जाहिरात छान आहे तुमची !

चकोरचे मन : म्हणजे स्त्री-पुरुष अशी फ्रेंडशिप मान्य !

रचना : बोल ना -- गप्प का ? मीही अरेतुरे म्हणते -- चालेल ना ?

चकोर : चांगलं म्हटल्याचा मनात आनंद घेत होतो ! चालेल तर !

रचना : हं --

चकोर : या वेळी मोकळी कशी तू ?

रचना : निघणारच आहे थोड्या वेळानं -- नाईट ड्यूटी आहे --

चकोर : युनिफॉर्ममधला एखादा फोटो का नाही टाकला ?

रचना : पुन्हा तेच ! आणि इथे मी ड्यूटीवर थोडीच असते !

चकोर : काही असो, पण तुझ्यासारखीशी मैत्रीण म्हणून बोलता येणं ! कधी कल्पनाही नसती केली ! ( एवढ्यात शेजारी आणखी एक चॅटिंग विंडो ओपन होते -- यात मानसी आहे. )

मानसी : काय चाललंय ?

चकोर : ते सांगतो नंतर -- तीन दिवसांनी भेटतेयस -- आधी मिठीत ये -- एक किस दे -- मग --

मानसी : -- हं -- आता बोल --

रचना : काय झालं ? गप्पसा ?

चकोर : ( रचनाला -- ) उलट तुझ्याच बोलण्याची वाट पाहतोय -- ( मानसीला -- ) तुझा विरह सहन नाही बाबा होत --

मानसी : आणखी असतीलच की मैत्रिणी --

रचना : हं हं, डोंट वरी ! --

चकोर : ( रचनाला -- ) छान ! मनाला शांतता आली ! काय आहे, चुकून बोलताना ' प्रिय मैत्रिणी ' किंवा ' प्रिये ' असं म्हटलं जाऊ शकतं गं -- त्याची भीती वाटते --

रचना : बरं, भेटू -- मी चाललेय आता --

चकोरचे मन : म्हणजे भ्यायचे अजिबात कारण नाही !

चकोर : हो -- भेटू -- बाय !

रचना : बाय ! ( रचनाची विंडो जाते. )

मानसी : तू बोलतोयस का आणखी कुणाशी ? वेळ नसला तर जाते मी --

चकोर : अगं, तसं नाही -- फोनची रिंग झाली म्हणून जायला लागलो तर बंद झाली -- जाऊ दे --

मानसी : हं --

चकोर : हं -- मग -- झाली महाबळेश्वर ट्रिप ? -- पतिदेव खुश ?

मानसी : झाली ना ! सारख्या चुकाच काढतो तो माझ्या ! मला काही मजा नाही आली --

चकोर : आलीयस ना आता माझ्याजवळ -- फरगेट इट ! ( इथे नवी विंडो ओपन होते -- इथे गंधाली. तिला -- ) हं -- बोल --

गंधाली : मला अशक्य झालंय आता त्या माणसाबरोबर राहणं --

चकोर : पुन्हा नवऱ्याशी भांडण ?

गंधाली : पुन्हा काय ? सततच ! वैतागलेय मी --

मानसी : सेल्फरिस्पेक्टनं जगताच येत नाही रे --

चकोर : ( गंधालीला -- ) एक सांगू का ? -- सोपं सांगतोय --

गंधाली : हं -- सांग --

चकोर : ( मानसीला -- ) तुझ्या नवऱ्याला सगळी शरीर-कष्टाची कामं करू दे -- प्रेमबीम अशा हायर लेव्हलच्या कामांसाठी माझ्याकडे ये -- ऑन लाईन --

चकोरचे मन : हेच कॉपीपेस्ट इकडेही चालेल !

चकोर : ( गंधालीला -- ) तुझ्या नवऱ्याला सगळी शरीर-कष्टाची कामं करू दे -- प्रेमबीम अशा हायर लेव्हलच्या कामांसाठी माझ्याकडे ये -- ऑन लाईन --

मानसी : हं --

गंधाली : हं -- ( इथे आणखी एक विंडो ओपन होते -- यात इहा आहे. )

इहा : काय चाललंय ?

चकोर : आत्ताच आलोय --

इहा : बंडल नको मारूस -- बराच वेळ दिसतोयस तू इथं --

चकोर : अगं, वेडे -- चॅटिंगला आत्ता आलोय -- लोकांच्या जरा स्टेटस पाहात होतो --

इहा : हं -- काय आहे, आजच्या स्टेटसमधलं आवडण्यासारखं ?

चकोर : मी तुला म्हणालो होतो, त्याचा काय विचार केलास ?

मानसी : आज माझी बहीण आणि तिचे मिस्टर येणार आहेत थोड्याच वेळात -- त्यामुळे रात्री भेट शक्य नाही --

चकोर : ठीक --

गंधाली : आय ॲम रिअली फेड अप !

चकोर : ( इहाला -- ) तू कविता लिही, असं मी तुला म्हणालो होतो --

इहा : हो रे, प्रयत्न करेन !

चकोर : प्रयत्न कशाला -- म्हणताना भरघोस ' हो ' म्हणत जा ना !

इहा : हो !

चकोर : ये हुई ना बात !

चकोर : ( गंधालीला -- ) डोक्यात राख घालून वागू नकोस -- कधीही --

मानसी : जाऊ का मी ?

चकोर : ( मानसीला -- ) थांब ना गं !

मानसी : तुलाही वेळ दिसत नाहीय आणि मलाही कामं आहेत --

चकोर : जसं काही उत्तराला तुला कधी वेळ लागतच नाही ! -- तुलाही मधेच फोन येतो -- नवरा काहीतरी विचारायला येतो -- नाही होत असं ?

मानसी : तुझ्याशी भांडायचं नाहीय मला -- मैत्री टिकवू या !

चकोर : मैत्रीला काही नाही होणार -- डोंट वरी !

गंधाली : सांगता नाही येत, असं काही घडणारच नाही, डोक्यात राख वगैरे, असं -- सारखीच चीड असते डोक्यात --

चकोर : ( इहाला -- ) कविता लिहीच --

मानसी : मी जातेच --

चकोर : फक्त तुझ्या हाताचं चुंबन घेतोय -- जा -- गुड नाईट !

मानसी : गुड नाईट ! ( तिची विंडो जाते. )

इहा : ऑफीसच्या एका परीक्षेला बसतेय -- सांगितलं ना -- त्यानंतर कविता -- चल, निघतेय --

चकोर : टेक केअर -- गुड नाईट !

इहा : गुड नाईट ! ( तिचीही विंडो जाते. )

गंधाली : लक्ष आहे का तुझं ?

चकोर : म्हणजे काय ? तू जवळ असताना आणखी कुठे असणार लक्ष ?

चकोरचे मन : अरे वा ! ही कालच ओळख झालेली आलेली दिसतेय -- वामा -- ओळख वाढवायला तर हवीच -- कुणाचा कधी कुठे कसा उपयोग होईल, ते सांगता येत नाही -- ( तो क्लिक करतो -- वामाची विंडो येते. )

चकोर : ( वामाला -- ) कशी आहेस वामा ?

वामा : छान !

चकोर : आज तू बोलणार आणि मी ऐकणार --

वामा : का ?

चकोर : बदल --

गंधाली : तू तुझ्या बायकोबद्दल सांगणार होतास -- इतके दिवस आपली मैत्री असून मला तिच्याबद्दल काहीच माहिती नाही --

चकोर : ( वामाला -- ) सांगतो ना --

चकोरचे मन : काय सांगतो ना -- वामाला ? -- डिलीट कर ! ( ते वाक्य डिलीट करतो. )

चकोर : ( गंधालीला -- ) सांगतो ना !

वामा : एक गंमत सांगू ?

चकोर : सांग --

वामा : आज अचानक पावसाची सर आली आणि मी चिंब भिजून गेले अगदी !

चकोर : माझ्या नजरेपुढे ते दृश्यच उभे राहिलेय आणि मी ते मनसोक्त एंजॉय करतोय --

चकोरचे मन : याचा अर्थ ' ओलेती ' ! ती पूर्ण भिजलेली -- कपडे अंगाला घट्ट चिकटलेले -- असे मी पाहतोय आणि त्याचे सुख अनुभवतोय ! -- नवी ओळख असली तरी इतपत इंडिकेशन द्यावंच लागणार -- एक तर चालेल, नाही तर चालणार नाही ! -- आणि हे काही चालणारच नसेल तर मी तरी करू काय, निरर्थक गप्पा मारून ? एवढं रिस्क तर घ्यावंच लागणार ! ..... यावर काय ते म्हणायला वेळ लावतेय ! डिस्टर्ब तर झाली नसेल ? ( तिच्या विंडोत स्मायली येते. ) बास !!! आता हाच विषय वाढवायचा नाही -- ' चालेल ' एवढं कळलंय -- आजचं काम झालं !

चकोर : ऑफीसमधून येताना का ?

वामा : हो -- ए, मी जातेय आता -- स्वयंपाकात आहे -- बाय --

चकोर : भेटू पुन्हा -- ( स्वत:शी -- ) च्यायला, गेली पण ! ( आता गंधालीला -- ) कर्सर हलतच नव्हता -- काही तरी प्रॉब्लेम असेल -- तू रागावतेयस की काय म्हणून इकडे मी हवालदिल ! -- आहेस ना ?

गंधाली : सुटला का आता प्रश्न ?

चकोर : त्याशिवाय बोलता आलंय का मला ?

चकोरचे मन : आता ही एकटीच आहे -- हिच्याशीच बोलावं -- छप्पन विंडोज नकोत -- ऑफलाईनच व्हावं -- ( तसे करतो.)

गंधाली : आहेस ना ? एकदम ऑफलाईन कसा झालास ?

चकोर : अगं मुद्दामच झालो -- काहीजण उगीचच ' काय कसे आहात -- काय करताय ' एवढं विचारण्यासाठी नुसतं डिस्टर्ब करत राहतात -- कंटाळा येतो -- आहे मी --

गंधाली : मी मात्र माझा प्रॉब्लेम सांगितला तुला आणि तू मात्र सांगत नाहीस --

चकोर : अगं, असं नाही -- काहीही विचार --

गंधाली : तुझी बायको कशी आहे ? ती असते का फेसबुकवर ?

चकोर : शाब्बास ! म्हणजे तिच्याशी कर फ्रेंडशिप आणि ठेव सतत मला तणावाखाली की बाबा चुकून ही काही बोलून तर जाणार नाही ? !

गंधाली : असं कशाला करीन मी ? नसेल सांगायचं तर जाऊ दे --

चकोर : अगं, असं नाही -- सांगतो ना -- ती नसते एफबीवर -- तिला ते अजिबात आवडत नाही -- एवढंच नाही -- तिला सेक्सरिलेटेड असं कुणी काही बोललेलंही आवडत नाही --

गंधाली : म्हणजे तूही ? तुमचं कसं चालतं मग ?

चकोर : आम्हाला नाही काही प्रॉब्लेम -- तशी मस्त आहे ती --

गंधाली : मग ?

चकोर : भोळी आहे -- असं मला वाटतं -- त्यामुळं ती बिचकूनच राहते सगळ्यांना --

गंधाली : अच्छा --

चकोर : आजच अपवाद घडलाय -- घरी यायला बराच उशीर झालाय तिला आणि मोबाईल घेत नाहीय --

गंधाली : भोळी असेल तर धोका काय आहे ?

चकोर : अगं, भोळी असणं हेच धोक्याचं नाही का ? -- आणि खरं सांगू का -- मलाही नीट कळलेलाच नाहीय तिचा स्वभाव -- असं वाटतं कधी कधी --

गंधाली : हं --

चकोर : थांब, आली ती -- बंद करतोय -- पुन्हा बोलू -- सॉरी -- भेटू -- बाय ! ( पटकन सगळे बंद करतो आणि लॅपटॉप ठेवून देतो ... )

**स्वप्नदृश्य**

समोर फेसबुक स्क्रीनवर पाच चॅटिंग विंडो ओपन आहेत. रचना, वामा, ईशा, मानसी आणि गंधाली. चकोर झोपलेला आहे. आलोक येतो. हे एक स्वप्नदृश्य आहे.

आलोक : काय चाललंय चकोरजी -- ( चकोर झटकन उठतो, पटकन कॉंप्यूटरकडे जातो. ' बाय ' असे प्रत्येक ठिकाणी म्हणून ती ती विंडो बंद करत जातो. शेवटी कॉंप्यूटर बंद करतो. मग घाईत पुढे येतो. )

चकोर : काही नाही, ठीक आहे, या ना -- या !

आलोक : आलो तर आहेच हो ! तुम्हाला एक आठवलं म्हणून सांगतो -- मी एक माणूस पाहिला होता -- तो एका वेळी -- सलग हं -- पाच चेंडू एकामागोमाग एक असे हवेत उडवायचा आणि झेलत राहायचा. म्हणजे, एक चेंडू तो झेलायचा तेव्हा उरलेले चार हवेत असायचे ! -- एकही कधी खाली पडायचा नाही ! ओळीनं झेलत-उडवत राहायचा ! चमत्कारच एक !

चकोर : खरंच -- अवघडच ! चमत्कारच म्हणेल त्याला कुणीही !

आलोक : पण तुम्ही त्याच्याहून भारी आहात !

चकोर : मी ? नाही हो -- छे !

आलोक : एका वेळी पाच चॅटिंग विंडो ! काय चेष्टा आहे काय ! त्याला तर क्रम पाळून एकामागोमाग एक चेंडू झेलायचे असायचे -- तुमचं तसं नाहीय ! कुठलाही चेंडू कधीही झेलावा लागेल ! क्रम अनप्रेडिक्टेबल ! यू आर ग्रेट !

चकोर : ( गडबडून -- ) म्हणजे ? मी समजलो नाही --

आलोक : फेसबुक चॅटिंग हो ! एकदम पाचजणींशी चाललं होतं वाटतं !

चकोर : मी पाया पडतो तुमच्या -- तुम्ही हवं तर गुरू व्हा माझे -- पण, सारखं असं उघडं नका पाडू मला -- प्ली ऽ ज !

आलोक : पण, ओळखलं की नाही करेक्ट ?

चकोर : होय हो -- कसं ओळखलंत ते सांगा ना --

आलोक : अहो, साधं आहे -- ' बाय ' म्हणजे बीवायई तीन अक्षरे -- बाय, एक क्षण, पुन्हा बाय, एक क्षण -- असं पाच वेळा झालं -- एकाच प्रकारे -- आणि कॉंप्यूटर बंद करून तुम्ही इकडे आलात ! आणि तुम्हाला मी ओळखतो ! -- त्यावरून समजून घेतलं की तुमच्या पाच चॅटिंग विंडो चालू असाव्यात !

चकोर : मानलं तुम्हाला ! मागे, तुमच्या घरीही मानलंच होतं ना ! पण आता काय -- म्हणजे, या पामराकडे का येणं केलंत ?

आलोक : जाऊ का ? घर तुमचं आहे -- तुम्ही ' जा ' म्हणू शकता !

चकोर : नको -- नाही हो ! तुम्हाला ’ जा ’ म्हणणं मला परवडणार नाही हो ! राह्यचंय मला या जगात !

आलोक : तसं काही नाही हो -- सहज भेटायला आलोय ! तुम्ही दिलेलं कार्ड पाहिलं होतं -- पत्ता लक्षात होता -- वेळ होता -- म्हटलं पाहू --

चकोर : पण आत्ता मला जरा बाहेर जायचं आहे --

आलोक : अर्जंट आहे का ?

चकोर : होय हो -- जावंच लागेल --

आलोक : की मला घालवण्यासाठी म्हणताय ?

चकोर : नाही हो -- खरंच --

आलोक : ठीक -- तुमच्या मिसेसची ओळख तर द्या करून --

चकोर : हो, जरूर -- ए ऽ कामिनी ऽ

कामिनी : ( आतून -- ) ओ --

चकोर : ये ना जरा बाहेर --

कामिनी : ( आतूनच -- ) हो, आलेच -- ( येते. )

चकोर : हे माझ्या एका कॉलेजातल्या मैत्रिणीचे मिस्टर -- मिस्टर आलोक ! जादूगार आहेत !

कामिनी : जादूगार ?

चकोर : नाही, नाही -- सीआयडी इन्स्पेक्टर आहेत ! गंमतीनं मी त्यांना जादूगार म्हणतो !

कामिनी : हं हं ! छानच ! पण जादूगार का ?

चकोर : अगं, मनातलं ओळखता येतं यांना ! म्हणजे हे एखाद्या ठिकाणी नसतानाही तिथं काय झालं असेल ते --

आलोक : छे हो ! तसं काही नाही ! एक साधं लॉजिक वापरतो झालं ! चकोर, काही तरी नका सांगू हो -- त्यांना वाटायचं की मी एक सिद्धपुरुष आहे --

चकोर : मला तर तसंच वाटतं -- म्हणजे सिद्धपुरुष -- एक शब्द -- सिद्ध पुरुष -- असं नव्हे --

आलोक : ते बरोबरच आहे हो -- ते तर ज्या अनुभव घेतील त्याच म्हणतील ना ! असो ! यांची ओळख सांगा ना --

चकोर : हो -- ही माझी पत्नी कामिनी -- ( ती हसून नमस्कार करते, आलोकही करतो. ) चला, मी जरा घाईत आहे --

आलोक : मीही निघू का मग ?

चकोर : चला ना -- मी सोडतो तुम्हाला -- कुठे जायचंय ?

कामिनी : थांबा हो, आत्ताच तर ओळख झालीय -- चहा तरी घेऊन जा ना -- पहिल्यांदाच आलायत -- त्याला जाऊ द्या --

आलोक : असं म्हणता ? चालेल -- ( चकोरला -- ) आणि मी जाईन -- माझी आणलीय ना गाडी --

चकोर : ( बाहेर जावे न जावे -- असा घुटमळत -- ) हं – ( हरवल्याप्रमाणे -- ) चहा घेऊन जा ना --

कामिनी : आलेच हं -- बसा तुम्ही -- ( ती आत जाते. )

आलोक : चकोर, आता इलाज नाही -- मला घालवण्यासाठी तुम्ही जर हा अर्जंटली बाहेर जायचा डाव काढला असेल तर तुमच्या तो पूर्ण अंगलट आलेला आहे -- जा आता तुम्ही --

चकोर : तसं नाही -- मला खरंच एक काम आहे -- तुमच्यावर डाव टाकणं माझ्या स्वप्नातही येणार नाही -- आत्ता हे चाललंय ते स्वप्नच आहे म्हणा --

आलोक : पण मी असं तुमच्या स्वप्नात यावं इतकं कसं काय घाबरलात तुम्ही ? मी काही फारसा विध्वंसक वृत्तीचा माणूस नाहीय --

चकोर : पण सर्जकता -- क्रिएटिव्हिटी -- कल्पनाशक्ती -- आणि हो -- वैचारिक उत्तुंगता -- खूप आहे तुमच्याकडे !

आलोक : चला, निघा मग आता --

चकोर : होय -- माझ्याच घरात येऊन मलाच ’ निघा ’ म्हणताय ! पण, एक मित्र म्हणून -- चहा झाला की तुम्हीही निघालच, या विश्वासानं जातोय --

आलोक : निर्धास्त जा तुम्ही -- डोंट वरी -- आणि माझं जाऊ दे -- तुमच्या पत्नीवर तरी तुमचा विश्वास असेलच ना ! काळजी कसली करताय ?

चकोर : तसं नाही हो होऊ शकत -- आपण स्वत: प्रतारणा करणारे असल्यावर बायकोवर विश्वास नाही टाकता येत -- तुम्ही जरा तज्ञ आहात म्हणून सांगितला हा प्रॉब्लेम -- याच्यावर काय करावं, हे समजण्यासाठी हवं तर तुमची शिकवणी लावेन मी -- पण, प्ली ऽ ज --

आलोक : नका काळजी करू -- जा तुम्ही -- शेवटी आपल्या हातात काहीच नसतं, हे जाणताच तुम्ही -- ( इथे कामिनी येते. )

कामिनी : अरे, हा इथेच अजून ? ! अरे, काम होतं ना तुला ? --

चकोर : हो -- निघतोच -- ( जायला निघतो -- )

कामिनी : ( आलोकला -- ) मला सांगा -- तुम्हाला चहा आवडेल की कॉफी ?

आलोक : तुम्हाला काय आवडतं ते सांगा --

कामिनी : मला कॉफी आवडते --

आलोक : मग कॉफीच -- कॉफीच पिऊ दोघेही --

चकोर : बरं, मी चलतो --

आलोक : हो, या -- मी जाईन यांच्याशी गप्पा मारून -- ( चकोर बाहेर जातो आणि क्षणभराने एका स्टुलासह आत येतो आणि त्यावर बसतो. म्हणजे, तो गेला तरी त्याचे मन इथेच आहे. )

कामिनी : आत्ता हा कुठं गेला, कोण जाणे !

आलोक : मजेदार आहेत तुमचे पतिदेव ! मस्त जगत असणार तुम्ही !

कामिनी : ते आहे हो -- पण पहिलाच विषय हा नको --

आलोक : तुमची मर्जी ! तुम्हाला आवडेल त्याच विषयावर बोलू -- मी असणार किती वेळ इथं -- त्यात तुम्ही नाराज व्हावं असं काहीच नको --

कामिनी : तसं नाही हो -- त्याची न् माझी जरा भांडणंच जास्त होतात हल्ली -- म्हणून म्हटलं --

आलोक : पण, छान, एक आनंदी जोडपं वाटता तुम्ही --

कामिनी : अहो, सगळी जोडपी तशीच वाटतात -- असं पाहून काही कळत नाही --

आलोक : ते आहे म्हणा !

कामिनी : तुमच्या मिसेस याच्या कॉलेजात होत्या का ?

आलोक : होय --

कामिनी : तुमचा आहे ना जरा कंट्रोल तुमच्या मिसेसवर ?

आलोक : कशाला ?

कामिनी : अहो, हल्ली कुणीही कुणालाही आवडतं ! आवडलं की झालं ! प्रेमातच पडतात ! आणि असं कितीही वेळा होऊ शकतं ! -- सॉरी हं -- तुमच्या मिसेस असतील सरळ, साध्याभोळ्या --

आलोक : माझं मत सांगू का तुम्हाला ?

कामिनी : अहो सांगा ना, त्यात काय विचारायचंय --

आलोक : माझ्या मते सगळ्याच स्त्रिया या सरळ, साध्या आणि भोळ्याच असतात -- पुरुष बहकवतात त्यांना !

कामिनी : तुम्हाला सध्या स्त्रियांची बाजू घ्यायचीय, हे कळतंय मला, पण, अर्धसत्य आहे हे -- आलेच -- कॉफीचं बघतेय -- ( जाते. )

आलोकचे मन : आपण खोटं बोलतोय हे तिनं ओळखावं आणि त्याला खोटं म्हणावं, हाच तर आपला हेतू होता --

चकोर : माझ्या डोळ्यांसमोर डाव टाकतोय -- च्यायला ! ( आलोक शांत बसून. ती कॉफीचे मग असलेला ट्रे घेऊन येते. )

कामिनी : हं -- घ्या -- ( आलोकला एक मग देते, एक आपण स्वत: घेऊन बसते. ) अहो, स्त्रिया काय नि पुरुष काय -- सारखे सेक्सच्याच विचारांत असतात -- किळस येते मला --

आलोक : तसंही असेल बाबा -- माहीत नाही -- पण, मला किळस नाही येत, इतकंच ! पण, म्हणजे, स्त्रियाही बहकवतात का पुरुषांना ? की काही पुरुषही साधेभोळे असतात, असं म्हणायचंय तुम्हाला ? -- तुम्ही काही तरी महत्त्वाचं बोलताय, हे नक्की !

कामिनी : दोघांच्याही मनांत असणार हो -- पुरुष आधी अंदाज घेतात, इतकंच !

आलोक : हे मात्र खरं आहे हं -- माझं मघाचं वाक्य मी बदलायला तयार आहे -- स्त्रियांनाही हवंच असतं ते --

कामिनी : म्हणजे मला नाही हं -- मला किळस आहे त्याची --

आलोक : मी थोडाच तुमचा अंदाज घेतोय ?

कामिनी : तर, तुमच्या पत्नीबद्दल सांगा ना --

आलोक : छान आहे ! मला आवडतेच ती ! पण, सांगता येत नाही -- तुम्ही म्हणता तसंही असू शकेल थोडं --

कामिनी : अर्थात, लगेच काही होईल, असं नाही म्हणा -- स्त्री तरी लगेच प्रेमात पडल्याचं दाखवणार नाही -- जरा वेळ लावेलच -- पुरुष अधीर असला तरी --

आलोक : बराच अभ्यास आहे की तुमचा -- नाही, नाही म्हणता ! तुमच्याशी असं काही वेळा बोलणं घडलं तर खूप काही भर पडू शकेल ज्ञानात !

कामिनी : कसलं हो ! एक निरीक्षण, एवढंच ! हेच तर चालू असतं सगळीकडे ! पाहून पाहून माझंही डोकं तसंच होईल की काय, याचीच भीती वाटते मला --

आलोक : थोडक्यात म्हणजे, तुमच्या पतिदेवांवर तुमचा विश्वास दिसत नाहीय – ( तो मग ट्रे मध्ये ठेवतो. )

कामिनी : आता तुम्ही काही परके नाही --

चकोर : ( ओरडतो -- ) परके नाही ? !

कामिनी : कसा असेल विश्वास, सांगा ना ! ठिकठिकाणी पाहते ना मी -- त्याचं लक्ष कुठं असतं ते ! आता बोलू नका कुठं -- पण, याच्या मोबाईलवर सेव्ह केलेल्या नंबरांत इतक्या बायकाच कशा ? -- सांगा ना -- कळतंच ना ते -- असं ना तसं -- कधी ना कधी --

चकोर : ( स्वत:शी -- ) आयला, म्हणजे चोरून केलेला दिसतोय हा उद्योग !

आलोक : असं असेल तर गंभीर आहे मग !

कामिनी : सांगतेय काय मग !

आलोक : तुम्ही काही तरी उपाय करायला हवा यावर !

कामिनी : तुमची पत्नी समजा अशी असती -- समजा म्हणतेय मी -- तर तुम्ही काय केला असता उपाय ? -- खरंच मला उत्सुकता आहे याची -- ( मगांचा ट्रे आत नेऊ लागत -- ) आलेच --

आलोक : अहो, तुमचे पती काय म्हणत होते ते सांगतोच आता --

कामिनी : ( थांबत -- ) सांगा ना --

आलोक : या ना तुम्ही ते ठेवून --

कामिनी : ( बसत -- ) नाही, सांगाच आधी --

आलोक : अहो, त्यांचा म्हणे तुमच्या वागण्यावर विश्वासच नाहीय --

कामिनी : बघा -- म्हणजे, चोराच्या उलट्या --

आलोक : म्हटलं, का बाबा ? तर म्हणे ते स्वत: प्रतारणा करणारे आहेत मग दुसऱ्यावर विश्वास कसा ठेवणार ?

कामिनी : अस्सं ! आलेच हं -- ( ट्रे घेऊन आत जाते. )

चकोर : ( पुढे येत -- ) हे ठीक नाहीय हं -- विश्वासघात होतोय हा -- प्ली ऽ ज --

आलोक : आपण सगळेच करतो ना एकमेकांचा विश्वासघात -- एवढं तर चालणारच -- मला त्यांचा विश्वास संपादन करायचाय ना --

चकोर : प्ली ऽ ज -- आता बास पण -- हवं तर मी तुम्हाला माझे सगळे उत्तमोत्तम कपडे देतो -- अनेक फॅशन्सचे आणि रंगांचे ! काय कमीजास्त असेल ते आल्टर करून घ्या -- असे कपडे तुमच्याकडे असणंच शक्य नाही -- माझ्या खास अभिमानाच्या गोष्टी आहेत या -- हे कपडे --

आलोक : आणि ते कपडे गायब कुठं झाले, असं पत्नीनं विचारलं तर ?

चकोर : ठीक -- रोज एकेक देत जाईन आणि इकडे एकेक वेगळा नवा घेत राहीन -- रोज सकाळी साडेनऊला मी शंकाराच्या देवळाजवळ असतो -- तिथे भेटत जाऊ -- तिथे देत जाईन --

आलोक : मग त्यापेक्षा मलाच नवे द्या ना --

चकोर : होय ! यस ! सॉरी ! मला तुमच्यासाठी त्याग करायचा होता ना -- त्यामुळं हे लक्षातच आलं नाही --

आलोक : काय येडेबिडे आहात काय ? ते तसले तुमच्यासारखे रंगीबेरंगी कपडे मी कधीच वापरत नाही --

चकोर : ठीक आहे -- प्लेन घ्या मग नवे --

आलोक : ते तर आहेतच ना माझ्याकडे -- ( कामिनी येते. )

चकोर : पण, माझं घर मला राहू द्या -- माझं हक्काचं घर -- ( पुन्हा जाऊन स्टुलावर बसतो. )

आलोक : माझा एक वेगळाच प्रॉब्लेम होतोय --

कामिनी : कोणता ?

आलोक : अहो, मला तुमच्याबद्दल प्रचंड आपुलकी वाटायला लागलीय -- तुम्हाला त्यात सेक्सची शंका आली तर -- तुम्ही शी-घाण म्हणणार --

कामिनी : अहो, नुसतीच आपुलकी नाहीय ही -- तुम्ही तर माझ्या जगण्यातच इंटरेस्ट घेताय -- माझ्या जगण्याची काळजी घेताय --

आलोक : एक मित्र म्हणून फक्त --

कामिनी : असे मित्र सहजासहजी नाही मिळत --

आलोक : तरीही एक होतोयच प्रॉब्लेम --

कामिनी : आता काय आणखीन ?

आलोक : अहो, कितीही दुर्लक्ष करायचं ठरवलं तरी तुम्ही सुंदर असल्याचं जाणवतच राहतं हो -- हे चांगलं नाही, योग्य नाही -- असं कितीही बजावलं मनाला -- तरीही --

कामिनी : तेवढं तर होणारच हो -- निसर्ग आहे तो -- आणि मी आहेच थोडी सुंदर, हा काही तुमचा दोष नाही -- बोला तुम्ही -- मी गैरसमज नाही करून घेणार --

आलोकचे मन : उलट, व्हायलाच हवाय थोडा गैरसमज ! आणि ते चालवून घ्यायला हवंय !

आलोक : हं -- मग ठीक आहे --

कामिनी : म्हणजे तो माझ्याशी प्रतारणा करतो, हे मान्यच केलं त्यानं ! तुम्ही मला एका गोंधळातनं मुक्त केलंत !

आलोक : कोणत्या ?

कामिनी : अहो, मला खूप जोरदार संशयच होता नुसता -- आता निर्णयच झाला ना ! गोंधळ संपला !

आलोक : पण, वाईट नाही का झालं हे ? तुम्हाला न पटणाऱ्या गोष्टीची खात्री पटणं --

कामिनी : अशी गुंतागुंत नाहीच करायची -- तुम्ही माझ्या बाजूचे आहात, हे नक्की ! माझ्या बाजूचं मला कुणीच मिळत नव्हतं -- तुम्ही मिळालात !

आलोक : मी आहेच हो -- तुमचाच --

कामिनी : म्हणजे माझ्या बाजूचे नं ?

आलोक : तुम्हाला आवडेल तसं समजा हो – प्रत्येक गोष्ट निश्चित व्हायला हवी, असं काही नाही --

कामिनी : सेक्सला मी शी-घाण मुद्दामच म्हणत असते -- तुम्हाला म्हणून सांगते -- मला डाऊट असतो ना त्याचा म्हणून ! -- प्रत्येक वेळी दुसरीकडे आकर्षित होताना त्याला माझे हे शब्द आठवावेत आणि त्याचा मूड जावा -- यासाठी करते मी ते --

चकोर : आयला ! खरंच होतं च्यायला असं कधीकधी -- सगळी मजाच जाते तिच्या मारी --

आलोक : तुम्ही एकट्या समजू नका स्वत:ला -- मी आहे तुमच्या बरोबर --

कामिनी : हे एक छान घडलंय --

आलोक : आणि आता सांगतो -- मलाही आहेच हा प्रॉब्लेम -- तो माझा मी सोडवू शकतो म्हणा -- पण, आता तुम्हीही आहातच ना माझ्याबरोबर --

कामिनी : म्हणजे तुमची बायको आणि माझा नवरा -- असा आहे का डाऊट तुम्हाला ?

आलोक : अहो, मी बॉक्सर आहे -- मी दातच पाडू शकतो तुमच्या नवऱ्याचे -- पण तो तुमचा नवरा आहे -- नाही करणार मी तसं -- शेवटी तुमची सुखदु:खं त्याच्याशीच बांधली गेलेली आहेत ! कितीही नाही म्हटलं तरी ! त्याची काळजी घेणारच मी --

कामिनी : होय ना ! असं मला समजून घेऊन माझी बाजू घेणारं कुणी भेटलंच नव्हतं मला -- ऑफिसात आहे एक कलीग -- खरंच चांगला आहे -- पण इतकं सगळं नाही बोललं जात ना --

आलोक : नेमकं तुमच्या पतिदेवांना बाहेर जायचं निघालं म्हणून हे बोलणं तरी होऊ शकलं आपल्यांत आणि मुख्य म्हणजे दोघांनाही उपयोगी पडेल अशी एक छान जवळीक तयार झाली !

कामिनी : तुम्ही जरा एक पाळू शकाल का -- जवळीक कितीही होऊ द्या तयार पण बोलण्यात ' जवळीक ' हा शब्द नका वापरू -- ते शिक्कामोर्तब झाल्यासारखं वाटतं -- ते टाळा शक्यतो --

आलोक : अरे, सॉरी हं ! मनातलं बोललं गेलं चुकून -- पण टाळू शकेन मी ते सहज --

कामिनी : अहो, ' सॉरी ' काय लगेच ? -- तेवढं काही नाही --

आलोक : माझं एक रीडिंग किंवा निरीक्षण सांगू का ?

कामिनी : सांगा ना -- विचारायचंय काय त्यात --

आलोक : तुम्ही तुमच्या नवऱ्यापेक्षा भारी आहात -- म्हणजे बुद्धिमान ! तो वेडा ठरेल तुमच्यापुढे !

कामिनी : कसलं हो ! माझा संसार कसा टिकेल, याच विवंचनेत असते मी --

आलोक : ती तर असतेच ना सगळ्यांनाच -- विवंचना --

चकोर : ( पुढे येत -- ) काय, चाललंय काय हे ? -- स्वप्न माझं ! घर माझं ! माझ्यासमोर हे ?

आलोक : ( चकोरला -- ) हे तुमच्या स्वप्नात चाललंय याचा तुम्ही गैरफायदा घेताय -- आमच्या प्रायव्हसीत नाक खुपसताय --

चकोर : आयला ! माझ्या बायकोबरोबर तुमची प्रायव्हसी ? ! मी हे चालू देणार नाही --

आलोक : आम्ही पुढं काय बोलणार आहे ते ऐकून तर घ्या -- तुम्हालाच आगाऊ सूचना नाही का मिळणार ?

कामिनी : ( चकोरला -- ) आम्ही काहीही वाईट करत नाहीय -- तुझ्याच कॉमन प्रॉब्लेम झालाय आम्हाला -- म्हणून आम्ही एकत्र येऊन एक होतोय, इतकंच --

आलोक : तुम्हीही बसा हवं तर इथं -- तुमचंच तर स्वप्न चाललंय ! इतका वेळ लांबून बघत होतात -- आता जवळून बघा --

चकोर : बसणारच आहे मी इथं ! --

आलोक : काम झालं का ते तुमचं ? मघाशी काही अर्जंट काम होतं ते ? ज्यासाठी तुम्ही बाहेर गेलात ते ?

चकोर : खड्ड्यात जाऊ दे ते -- आणि तुम्ही बॉक्सर असलात तरी मीही एक वकील आहे, हे विसरू नका -- माझे डाव कळणार नाहीत तुम्हाला --

आलोक : अहो, नुसती मैत्री तर करतोय सध्या –

चकोर : एवढी फास्ट ? मैत्री ?

कामिनी : स्वप्न तर आहे -- होऊ शकते !

चकोर : ( कामिनीला -- ) च्यायला ! तुला बरी संधी मिळालीय माझ्या विरुद्ध बोलायची --

कामिनी : विरुद्ध काय आहे यात ?

आलोक : तुम्हीही बसा ना—बसा -- तुमच्याच केसवर तर बोलतोय आम्ही --

चकोर : केस ?

आलोक : प्रॉब्लेम म्हणा ! झालं ? समजुतदारपणानं घ्या हो -- हक्काचं घर हवंय ना टिकायला तुमचं ? ( चकोर बसतो. ) हं ! ये हुई ना बात ! --

कामिनी : ऐकेल तो --

आलोक : आता, आमची दोघांची ओळख होताना, माझी यांना मदत होऊ शकेल, असं मनातही नव्हतं -- आता होतेय ना मदत तर मला आनंद घेऊ द्या ना त्याचा --

चकोर : कसली मदत ? खोटं आहे हे --

कामिनी : अरे, आपल्याच संसारासाठी घेतेय मदत --

आलोक : ( कामिनीला -- ) तर मला एक उपाय सुचतोय -- तो असा आहे -- काही मराठी पिक्चर्समधून पूर्वी येऊन गेलेला आहे, तोच --

कामिनी : कोणता ?

आलोक : असा एखादा वाह्यात नवरा असला की त्याची बायको दुसऱ्या एखाद्याशी लफडं केल्याचं नाटक करते आणि मग तो ताळ्यावर येतो !

चकोर : म्हणजे काय विचार ?

आलोक : यांना माझ्याशी लफडं करू द्या ना -- मग नंतर तुम्ही ताळ्यावर या --

कामिनी : हं -- मलाही वाटतंय की उपयोग होईल याचा --

चकोर : नो ! कधीकधी नाटक करता करता खरोखरच प्रेमात पडल्याची उदाहरणंही आहेत अनेक

पिक्चर्समधून --

आलोक : तसं थोडं रिस्क तर घ्यावंच लागणार ना -- नाही तर सुधारणार कसे तुम्ही ?

कामिनी : आणि मी कंट्रोल ठेवेन ना स्वत:वर --

चकोर : अजिबात नाही -- दुसरं काही बघा --

आलोक : उपाय कोण काढतंय ? कुणावर ? -- तुमच्यावर उपाय -- हा खरं तर आमचा दोघांचा खाजगी प्रश्न आहे -- तुम्हाला खरं तर हे कळायलाही नकोय --

चकोर : माझ्या बायकोबरोबर खाजगी ?

कामिनी : होय -- तुला हे कळलेलंच नाहीय, असंच तू समज --

चकोर : म्हणजे तू तयार आहेस ?

कामिनी : अरे, आपलाच संसार, घर सावरण्यासाठी रे -- मी काय सुखासुखी तयार होतेय का याला ?

चकोर : पण सुख मिळायला सुरुवात झाली तर ?

आलोक : असू द्या हो -- फार काळजी नका करू --

कामिनी : आणि तू सुधारेपर्यंतच चालणार हे --

चकोर : कामिनी, तू या माणसाच्या नादी नको लागूस -- फार पोचलेला माणूस आहे हा --

कामिनी : अरे, मी खरोखरची प्रेमात नाही पडणार बाबा --

चकोर : तुला कळणारही नाही, तुला यानं कधी प्रेमात पडायला लावलं ते -- फसशील --

कामिनी : तुझ्या या बोलण्यानं मला तर उत्सुकताच वाटायला लागलीय -- आणि नाही तरी तुझा हल्ली जरा त्रासच होतोय मला --

चकोर : मोहजाल निर्माण करू शकेल तो -- परतीचे दोर कापले जातील तुझे --आत्ताच विचार कर --

कामिनी : इतकी मोहक जादू आहे यांच्याकडे ? थोडा तरी अनुभव घ्यावाच मग -- आयताच मिळतोय तुझ्या निमित्तानं तर --

चकोर : मी घटस्फोट घेईन -- सांगतोय !

आलोक : हे बघा, तुम्हाला सुधारणं ही आमची दोघांचीही गरज आहे -- तुम्ही लुडबुड नका करू मधेमधे --

चकोर : वाईट आहे हे --

आलोक : अहो, स्वप्न तुमचंच चाललंय ना -- वळवा ना मग तुम्हाला हवं तसं --

चकोर : वळत नाहीय ते -- सारखा करतोय प्रयत्न --

कामिनी : म्हणजे तुझ्यातच खोट आहे !

आलोक : करेक्ट ! ( हात पुढे करतो -- कामिनी तिचा हात त्याच्या हातात देते -- )

चकोर : संयम सुटत चाललाय माझा -- तुम्ही बॉक्सर आहात हे विसरून हल्ला करीन मी -- ( आलोक कामिनीचा हात चुंबनासाठी त्याच्या ओठांकडे नेऊ लागतो -- ती नेऊ देते -- )

आलोक : डोळे मिटा हवे तर -- स्वप्नात -- ( तो चुंबन घेणार, एवढ्यात -- )

चकोर : ( ओरडतो -- ) थांबा ! सुधारलोय मी ! सुधारलोय ! ( कामिनी सस्मित आलोककडे पाहतेय -- आलोक चकोरकडे आणि चकोर कामिनीच्या हाताकडे – अंधार होत जातो. इथे हे  दृश्य संपते. )

( पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा तेच चकोरचे घर. चकोर घरच्या कपड्यांत   वर्तमानपत्र चाळत बसलेला -- प्रवेशव्दार दिसेल अशा अँगलने. दरवाजा उघडा. तो मधेच घड्याळाकडे पाहतो. पुन्हा वर्तमानपत्रात.

काही क्षणांनी कामिनी येते. दार लावून घेते. ती हातातल्या वस्तू ठेवते, बसते. जरा हाशहुश्श करते. चकोरकडे जणू लक्ष नाही.)

चकोर: बराच उशीर झाला ?

कामिनी: थांब जरा. एकदोन मिनिटं बसते स्वस्थ आणि मग देते उत्तरं सगळी. पण तुला काळजी वाटण्यासारखं काही नाहीय !

चकोर: मला ? काळजी ? कसली ?

कामिनी: थांब जरा, दोन मिनिटं कळ काढ. मी तरी तुझ्या मनाची किती काळजी घेणार ? एवढा वेळ सहन केलाच आहेस नं माझा उशीर ! आणखी दोन क्षण !

चकोर: सहन कशाला ? सहज विचारलं !

कामिनी: तुझं ' सहज ' माहिती आहे मला ! उलट माझं सगळं ' सहज ' असतं आणि तुझ सगळं परिश्रमपूर्वक असतं ! पण तुला वाटतं की माझं सगळं प्रयत्नपूर्वक चाललंय सारखं ! माहितीय मला ! ' सहज 'म्हणे ! सारखं आपली बायको कुठं हरवतीय का तिला कुणी पळवून नेतंय, हाच विचार ! तुला सोडून मी कुठं जाणार नाही ! आणि जाणार तरी कुठं ? आहे ते ठीक आहे !

चकोर: मला तर ही माझ्या, तुझ्यावरच्या प्रेमाची चेष्टा वाटते ! ( कामिनी काही क्षण डोळे मिटून बसते. स्वस्थ. ) झाली का विश्रांती ? असा आळशीपणा उपयोगी नाही. पटापट विश्रांती घेऊन कामाला लागलं पाहिजे माणूस ! काय !

कामिनी: हं, बोल.

चकोर: नाही, मी म्हणत होतो की तुला ऑफिसातून यायला आज उशीर का झाला ?

कामिनी: सेक्स हा विषय सोडून ही शंका आहे का ? की एक अंदाजे तपासणी चाललीय ?

चकोर: म्हणजे काय ? साधी चौकशीही करू नये ?

कामिनी: मला अक्षरश: किळस येते. सारखे सेक्सचे विचार ! तुझेच असं नाही -- जवळजवळ सगळ्यांचेच ! शी ! म्हणून मी ऑफिसातसुध्दा जरा फटकूनच राहते-वागते सगळ्यांशी ! स्त्री असो, पुरुष असो -- हेच सारखं डोक्यात ! शी !

चकोर: मी एका ठिकाणी असं वाचलंय की किळस हे आकर्षणाचंच दुसरं रूप असतं. मुळात यात काही फरक नसतो.

कामिनी: मला एवढं अवघड काही कळत नाही. आणि मला तसल्या अवघड गोष्टींची आवडही नाही. गरजही नाही त्याची. आणि मुख्य म्हणजे असलं काही ऐकलं की त्रासिक वाटतं मला. किळसवाणंच वाटतं !

चकोर: मी नुसतं साधं आपलं एक सांगितलं -- त्याच्यावर इतकी वाक्यं !

कामिनी: साधं नव्हतं ते !

चकोर: एवढी सगळी अवघड वळणं घेण्यापेक्षा ' उशीर का झाला ' या साध्या प्रश्नाचं साधं सरळ उत्तर देता आलं असतं तुला.

कामिनी: आमच्या ऑफिसातला जयकुमार -- माझ्या बोलण्यातून ऐकून तरी तुला माहिती आहेच -- त्याच्या घरी गेले होते. घरची परिस्थिती चांगली श्रीमंतीची आहे, पण गरीब आहे बिचारा ! तोही ऑफिसात कुणाशी फारसं बोलत नाही ! आपलं काम बरं, आपण बरं -- या पध्दतीनं राहतो बिचारा ! घरी एकटाच असतो तो ! अजून लग्नबिग्न काही झालेलं दिसत नाही बिचाऱ्याचं !

चकोर : आणि कळवायला काय झालं होतं ? आणि मी केला तर फोन का उचलत नव्हतीस ?

कामिनी : तुला तर कित्तींदा उशीर होतो -- तू कळवतोस का दर वेळी ? -- मी तर विचारतही नाही -- मला नको

थोडी स्त्रीमुक्ती ? आणि मी जयकुमारकडे जातेय हे सांगितल्यावर तू अडथळेच आणले असतेस ना ? ! सेक्सशिवाय असतं काय तुझ्या डोक्यात ?

चकोर: सगळ्या सुखात न्हाऊन निघतोय बिचारा !

कामिनी: एखाद्या साध्या माणसाची अशी चेष्टा करू नये. ऑफिसात असताना आम्ही मधनंमधनं कॉफी प्यायला एकत्र जातो नं, तर आज तो म्हणाला, माझ्या घरी चला, घरच्या कॉफीची चव घ्या. कॉफी खरंच छान केली होती त्यानं !

चकोर: पण काय विशेष ?

कामिनी: काही नाही, सहज !

चकोर: आईवडील, भाऊबहीण कुणीच नाही ?

कामिनी: उत्तरप्रदेशात कुठंतरी असतात म्हणाला. आणि कशाला आपण दुसऱ्याच्या खाजगी गोष्टीत जास्त खोलात जायचं ?

चकोर: ते बरोबर आहे. आणि पध्दतशीर नोकरी करतोय म्हणजे खरंही असेल म्हणा !... हा एकटाच इकडं आला म्हणजे !

कामिनी: एकटाच राहतोय, पण घर अगदी पॉश आहे. आपलं काहीच नाही त्याच्यापुढे !

चकोर: गरीब बिचारा !

कामिनी: म्हणजे काय ?

चकोर: तुला सांगू का, एखादं माणूस दुसऱ्याबद्दल फार सहानुभूती किंवा कीव दाखवायला लागलं ना की ते काहीतरी लपवणं चाललंय असं मला वाटतं !

कामिनी: यावर माझं म्हणणं, एक लपवायचं, एक दाखवायचं असं वागणं नसावंच माणसाचं ! म्हणजे मग असं काहीतरी वाटण्याचा त्रास होत नाही.

चकोर: मग सांग नं -- एवढा इतका अगदी तुला बिचारा वाटावा असे कोणते खास गुण आहेत त्या जयकुमारमधे ?

कामिनी: अरे, बिचारा असणं हाच एक गुण आहे नं !

चकोर: इतका ? !

कामिनी: कध्धी काही मनात नसतं त्याच्या ! साधा आहे अगदी !

चकोर: आता मी तुझा नवरा आहे म्हटल्यावर माझ्या मनात असणारच नं !

कामिनी: अंहं -- ते नाही -- एकूणच म्हणतेय मी !

चकोर: आता हे मला कळत नाही ! मग हे साधं की अवघड ?

कामिनी: माझं एखादं बोलणं लक्षात ठेवायचं आणि लगेच त्याची परतफेड करायची असं वागू नकोस -- साधं वाग ! पोरकटपणा करू नकोस !

चकोर: कसंही वागलं तरी चालतं -- प्रेम असणं महत्त्वाचं आहे !

कामिनी: साधेपणातच प्रेम असतं.

चकोर: मग आपलं आहे का एकमेकांवर -- प्रेम ?

कामिनी: याबद्दल मला कधीच शंका वाटत नाही. आहेच मुळी !

चकोर: आपलं एकमेकांवर प्रेम आहे आणि दुसरीकडं कुठंही अजिबात नाही, असं खरं तर व्हायला हवंय ! मलाही बरं वाटेल !

कामिनी: माझं तसंच आहे ! तुझं वेगळं आहे ?

चकोर: वेगळं नाही -- पण प्रेम असं वाढत वाढत जावं, असं मात्र वाटतं ! आहे एवढंच बास, असं मात्र वाटत नाही !

कामिनी: करतानाच पूर्ण प्रेम करायचं रे, म्हणजे मग वाढायचा वगैरे प्रश्नच येत नाही !

चकोर: ते आहे म्हणा ! ( जरा नाराज. )

कामिनी: बोलण्यात हरलास म्हणून नाराज होऊ नकोस ! आपण दोन नाहीच आहोत ! एकच आहोत !

चकोर: म्हणूनच मी धन्य आहे !

कामिनी: आपण दोघंही !

चकोर: तेच !

कामिनी: ते सगळं ठीक आहे, पण खरं -- तुझ्या मनातलं सांगू का ? -- मी कॉफी प्यायला जयकुमारच्या घरी का गेले ? मी किती वेळ तिथं होते ? आम्ही काय बोलत होतो ? घरात कुणीच नाही हे मला कधी कळलं ? त्यानं घरी बोलावल्यावर मी लगेच तयार कशी झाले ? तो दिसायला कसा आहे ? त्याचा आवाज, बोलणं कसं आहे ? दुसऱ्या कुणाशी तो फारसं बोलत नाही तर माझ्याशी कसं काय बोलतो ? -- या आणि अशा इतर प्रश्नांत तुला खरं तर इंटरेस्ट आहे ! सारखे सेक्सचे विचार मेले ! किळस येते मला !

चकोर: असलं काहीच माझ्या मनात नाही, असं म्हणायला भाग पाडतेयस तू मला -- एकदा जिंकत चाललं की जिंकतच जातं माणूस ! याच्यावर आता प्रामाणिकपणा हा एकच उपाय दिसतोय मला ! ( क्षणभरानं -- ) खरंच, हे प्रश्न आहेतच माझ्या डोक्यात !

कामिनी: हे तुझं प्रेम !

चकोर: हो, हेच माझं प्रेम ! पण सांग आता उत्तरं -- त्या प्रश्नांची !

कामिनी: सारखे सेक्सचे विचार मेले ! शी ! ( उठून आत जाते. )

चकोर: ( स्वत:शी -- ) शी, शी म्हणायची ही एक ट्रिकच आहे साली ! ( वैतागून बसतो. क्षणभरानं दारावरची बेल वाजते. तो उठणार एवढ्यात कामिनी आतून येते आणि दाराकडे जाऊन दार उघडते. दारात आलोक आणि पल्लवी. ती अर्थातच त्यांना ओळखत नाही. ती अजूनही त्या वादाच्याच मूडमध्ये आहे. )

कामिनी: कोण ?

आलोक: तुमच्याकडेच आलोय आम्ही. ( चकोर पाहतो. पुढे येतो. )

चकोर: अरे वा, या, या ! बसा ! ( कामिनीशी ओळख करून देत -- ) ही माझी पत्नी -- कामिनी -- आणि कामिनी, हे श्री.आलोक आणि या मिसेस पल्लवी यांच्या पत्नी -- या आणि मी कॉलेजात एकत्र होतो !

कामिनी: हं ! आलेच ! ( आत जाते. )

पल्लवी: इकडून निघालोच होतो, तर यांना आठवलं की तुम्ही इथे राहता -- भेटून येऊ म्हणाले !

चकोर: आलोच ! ( आत जाऊ लागतो -- )

आलोक: मिसेस नोकरी करतात वाटतं ! नुकत्याच आलेल्या दिसतायत ! एवढा उशीर होतो ?

चकोर: नाही, आजच झालाय उशीर ! आलोच ! ( जातो. )

आलोक: ( बसत -- ) यांच्यात काहीतरी वाद झालेला असून तो बहुतेक आज झालेल्या उशिरामुळेच झालेला असावा !

पल्लवी: आपल्याला काय करायचेत हे अंदाज ?

आलोक: आपण तर सहज म्हणून आलोय ! सुरुवातच विचित्र झाली ! हा एक साधा रूटीन वाद असेल ?

( चकोर आणि कामिनी बाहेर येतात, ते काही बोलण्यापूर्वीच -- ) कशी काय आता यांची तब्येत ? तुम्ही आमच्याकडे आलात तेव्हा या आजारी होत्या.

कामिनी: मला काय झालंय ? ( मूड अजून तोच. ) चांगली ठणठणीत आहे मी ! कधी आजारी होते मी ? ( चकोरला -- ) काय रे ?

चकोर: असं म्हणालो होतो मी ? तरी चारसहा महिने झाले असतील आपल्या भेटीला !

पल्लवी: हो, झाले असतील --

चकोर: काही आठवत नाही -- पण -- ( पल्लवीकडे पाहून फक्त आलोकना -- ) दिवस होते ना ?

आलोक: कुठलं काय, बोलून गेलो झालं त्यावेळी ! चारसहा महिने झालेच की त्याला !

चकोर: हो, हो -- एकच ते ! सगळं ओके असलं की सावधपणा जरा जास्त लागतो !

कामिनी : फालतूगिरी काहीतरी ! ( आलोकना -- ) तुम्ही चहा घेणार की कॉफी ?

पल्लवी: मी कॉफी घेते.

आलोक: मलाही कॉफी चालेल --

चकोर: छान ! चहापेक्षा कॉफी कधीही चांगली !

आलोक: ( चकोरला -- ) आलो की नाही आम्ही न बोलावता ?

चकोर: मी कार्ड दिलं होतं !

पल्लवी: गंमत रे !

आलोक: आम्ही उद्या चाललोय पिकनिकला माथेरानला -- येणार का ?

चकोर: नाही, सध्या जरा कामाचे प्रॉब्लेम्स आहेत --

आलोक: मग कामिनी वहिनी ?

कामिनी: मलाही नाही जमणार -- ( आत जाते. )

आलोक: ठीक आहे -- फिर कभी !... ( चकोरला -- ) आमच्या पल्लवीला जुन्या गोष्टींची भारी आवड ! तुम्ही गेल्यावरसुध्दा कॉलेजातल्या जुन्या मित्रमैत्रिणी वगैरे याच मूडमधे होती ती ! मीही ऐकत होतो. ( चकोर साशंकपणे पाहतो. )

पल्लवी: गेले ते दिवस ! ( चकोरला -- ) नाही का रे !

चकोर: हो नं !

पल्लवी: आज रजा घ्यायला लावलीय यांना !

चकोर: अरे वा !

पल्लवी: ( चकोरला -- ) तुझा कसा काय चाललाय व्यवसाय ? आणि इतर अभ्यास ?

चकोर: आहे आपलं, ठीकाय !

आलोक: अभ्यास कसला ?

चकोर: जाहिरातींसाठी हो -- उगीचच नॉलेज ठेवावं लागतं -- भारतात एनर्जी ड्रिंक्स किती आहेत, त्यांतली कोकोबेस, नॉनकोकोबेस कोणती --आयुर्वेदिक टूथपेस्टमधे ही का चालली नाही आणि ती का प्रचंड चालली, वगैरे --

आलोक: असेल, असेल --

चकोर: सारखं कल्पनाशक्तीला खाद्य तर जमवत राहिलंच पाहिजे ! कुठलीही कपॅसिटी, न वापरता पडून राहू नये !

आलोक: आम्हाला मात्र कल्पनाशक्तीच्या क्षेत्रातून लौकरात लौकर वास्तवात येणं आवडतं ।

चकोर: मी कुणाला आव्हान देत नाहीय ! प्रत्येकाच्या वेगवेगळ्या स्टाईल्स असतात ! स्वधर्मे निधनम् श्रेय: !

पल्लवी: ए ऽ संस्कृतपण येतं तुला ? ( हसते आणि आत जाते. )

आलोक: मला वाटतं, आम्ही लौकरात लौकर जावं इथून --

चकोर: का ? बसा हो !

आलोक: आपला दुर्गुण माहीत आहे तुम्हाला ! अंदाजांची साखळी ! उगीच नकोच ते ! तुम्हीसुध्दा फारसे मजेत दिसत नाही आहात !

चकोर: नाही, तसं काही नाही -- ( पल्लवी आणि कामिनी येतात. कामिनीच्या हातात कॉफीच्या चार कपबशा असलेला ट्रे. पल्लवी बसते. कामिनी प्रत्येकाला कॉफी देते. )

आलोक: ( कामिनीला -- ) वहिनी, तुमचा हात पाहून सांगतो, तुम्ही रांगोळ्या घालाल तर मोठ्या घालाल – बारीक नक्षीकाम तुम्हाला आवडणारच नाही -- मोठी कामंच आवडतात तुम्हाला --

कामिनी: ( मूड बदलत -- ) अय्या, खरंच -- भविष्य सांगता तुम्ही ? माझं सांगा नं ! दाखवू ?

आलोक: नाही -- हात सकाळीच पाहावा, रात्रीच्या दिव्याच्या उजेडात पाहू नये -- हा नियम फार तर मोडेन मी तुमच्यासाठी -- पण दुसरा नियम आहे -- हात पाहताना तिथं तिसरी व्यक्ती नसावी -- हा नियम मात्र मी मोडत नाही.

कामिनी: का ?

आलोक आता ’ का ’? अहो, एकदा, एकानं, असा चारचौघांत हात पुढे केला आणि सांगा म्हणाला, तर लगेचच दिसणारी गोष्ट म्हणजे त्याच्या शुक्र उंचवट्यावरचा काळा ठिपका -- आता त्याला मी सांगावं का सगळ्या लोकांत की बाबा, गुप्तरोगापासून जप म्हणून ! ?

कामिनी: माझं तसलं काही असणंच शक्य नाही !

आलोक: तेच असं नाही हो, प्रत्येकाचं थोडंफार तरी फक्त स्वत:लाच माहीत असलेलं असं जगणं असतंच नं ! इट इज नॉर्मल !

कामिनी: मला नाही असलं काही कळत ! आणि सेक्स या विषयाकडं तुमचा रोख असेल तर मला किळस आहे त्याची !

आलोक: छे, छे, तसलं काहीच म्हणायचं नव्हतं मला !

कामिनी: पण छान ओळख झाली आपली आज ! खरं तर मला फारसं बोलता येत नाही कुणाशी, पण तुम्ही दोघं छान -- प्रसन्न, निरागस वाटता ! ( एकेकजण रिकाम्या कपबशा ठेवतात. )

चकोर: निरागस ? लहान मुलं आहेत का ती ? हल्ली भाषेचा सेन्सच राहिलेला नाही कुठे ! बरोबर शब्द वापरणं, योग्य ठिकाणच्या आघातांनी बोलणं, हे खलासच झालंय !

आलोक: त्यांना ’ चांगलं ’ म्हणायचंय एवढं लक्षात घ्यायचं हो !

चकोर: आज पहिल्यांदाच वापरला तिनं तो शब्द ! ’ निरागस ’ ! ( आलोक खिसे चाचपतात. सिगरेट्स् संपल्याचं लक्षात येतं. )

आलोक: मी जरा सिगरेट्स् घेऊन येतो हं -- आलोच दोन मिनिटांत --

पल्लवी: नाही ओढली थोडा वेळ तर काय होईल ?

आलोक: आलोच ! ( जातात. कामिनी क्षणभरानं कपबशा ट्रेमधे घेऊन आत जाऊ लागते -- )

कामिनी: प्रसन्न आणि निरागस -- हे बरोबरच आहे ! आलेच हं -- ( आत जाते. )

चकोर: मुद्दाम कसं म्हणाली पाहिलंस ना !

पल्लवी: तेवढं तर होणारच रे ! पण तू असा दबून का वागतोयस ?

चकोर: तुम्ही यायच्या आधी आमचा जरा दुसरा काही विषय चालला होता. त्याचा परिणाम आहे हा -- एका साईडला डोक्यात तेच चालू आहे -- अर्थात् आलोक बरोबर नसते आणि नुसत्या आपल्यातच गप्पा मारायच्या असत्या तर मी ते विसरू शकलो असतो -- फेसबुकवर भेटतेस तेव्हा मी कसा असतो ? आज दिसली नाहीस तेव्हा वाटलंच मला की तू घरी नसणार -- पण मजा येते -- तुझ्याशी बोलतो तोच खरा माझ्या आयुष्यातला आनंदाच वेळ !

पल्लवी : म्हणजे असा आनंद देणारी मी एकटीच चॅट करते का तुझ्याशी ?

चकोर : विश्वास बसणार नाही तुझा -- पण -- होय ! अशी तू एकटीच !

पल्लवी : मला तर वीट येतो -- ऑन लाईन दिसले की आलेच सगळे !

चकोर : ते तुला सहज हँडल करता येईल -- हं, तुझ्या सांगण्याप्रमाणे मोबाईल आणि एसेमेसचा वापर बंद ठेवलाय --

पल्लवी: त्यांची काहीतरी अंदाजांची साखळी चालू झालीय म्हणत होते -- त्यातनं काही निघालं बिघालं तरी मनावर घेऊ नकोस -- कामिनी मला तरी छान वाटतेय -- पण तुला माझ्याशिवाय थारा नाही, असं होऊ देऊ नकोस --

चकोर: बरं होईल असं एकदाचं काही सापडलं आणि घडलं तर ! ( सावरत --) म्हणजे तसं नव्हे -- पण तरी नवरा बॉक्सर आहे तुझा -- ते मुख्य कसं विसरणार ?

पल्लवी: अरे पण माझी काही तक्रार असल्याशिवाय बॉक्सिंगचा उपयोग करतील का ते ?

चकोर: पण समजा काही कारणानं चिडून दिला एक त्यांनी मला असा गुद्दा ठेवून आणि पडले माझे दात तर पुढं काय करणार ? तुझ्या नवऱ्याविरुध्द मी तक्रार करायची ? कुठं ? त्याच्याच डिपार्टमेंटकडं ? आणि तुझ्याच नवऱ्याविरुध्द मी भांडतोय म्हटल्यावर तुला त्याच्या विरुध्द बोलता येईल ? नाइलाजानं का होईना पण तू राहणार सलामत, पण माझे दात ?

पल्लवी: पण असं चिडायला कारणच द्यायचं नाही ना !

चकोर: ते आहे, पण असे सगळे विचार असतातच !

पल्लवी: म्हणजे असलं काही तरी वागायचं तुझ्या मनात होतं ? ! बापरे ! मलाही काळजीच घ्यायला हवी म्हणजे ! ( कामिनी येते. ) मला वाटलं बराच काळ तुम्ही इथं राहताय !

चकोर: वर्ष झालं फक्त !

कामिनी: यानं कार्ड दिलं होतं तर तुम्ही फोनबीन नाही केलात कधी ?

पल्लवी: मला भीती होतीच तुम्ही असं विचाराल याची ! आरोप बिनशर्त मान्य !

कामिनी: आपल्या मनात काही नसलं म्हणजे झालं हो ! भीती कसली ! ( आलोक येतात. )

आलोक: ( कामिनीला -- ) खरं सांगतो, तुम्ही समजताय इतके आम्ही चांगले आहोत का, ही मला तरी शंका आहे आणि ती तुम्हाला न सांगणं म्हणजे तुमची फसवणूक होईल !

कामिनी: बघितलं की कळतं !

चकोर: स्पष्टच म्हणजे सगळ्यांच्या डोक्यांत सतत सेक्सचेच विचार असतात असं तिचं म्हणणं असून त्याची तिला किळस आहे -- तुम्ही तसे नाही असं म्हणायचंय तिला !

आलोक: ( कामिनीला -- ) पण तुम्हाला जे काय वाटलं त्याला अजिबात बाध न आणता आणि नम्रपणानं आणि शिवाय खरेपणानं मी असं म्हणेन की तुम्ही सुंदर आहात !

कामिनी: सुंदर म्हणा हो. आणि आहेच मी तशी. मनात काही नसलं म्हणजे झालं !

आलोक: तसं असतं तर माझ्या बायकोसमोर कसं बोलू शकलो असतो मी ?

पल्लवी: ( औपचारिकपणे -- ) खरंच छान दिसता तुम्ही !

आलोक: आम्ही कसले निरागस, तुम्ही निरागस !

चकोर: मी जेव्हा हिला म्हणजे पल्लवीला सुंदर म्हणतो तेव्हा माझ्याही मनात काही नसतं !

आलोक: म्हणालात काय तुम्ही असं कधी तिला ?

चकोर: समजा म्हणालो तर, असं म्हणतोय मी !

पल्लवी: म्हण रे ! त्यानं काही बिघडत नाही !

कामिनी: आमच्या ऑफिसात एक जयकुमार नावाचा माणूस आहे. ( आलोकना -- ) तुमच्या सारखाच छान आहे अगदी ! बाकीच्यांशी मी बोलतही नाही ! सारखे सेक्सचे विचार मेले डोक्यात ! शी ! साधं, सरळ वागणं नाहीच !

चकोर: मला नं कधीकधी असं वाटतं की खरंखोटं समजायची वाट न पाहता, आलंय ना मनात म्हटल्यावर ए ऽ क खाडकन देतात ठेवून ना काही लोक, त्यांचं बरोबरच असतं एका दृष्टीनं !

पल्लवी: अरे, अरे, ( आलोककडे पाहून पण बेफिकीरीनं जणू मुद्दाम चकोरजवळ जाऊन बसत -- ) असं म्हणू नये ! असं बोलल्यानं तुझा देखणेपणाही कमी नाही का होत ? आणि तू तर वकील आहेस ! खऱ्याचं महत्त्व माजवणं कित्ती महत्त्वाचं असतं, हे काय तुला सांगायला हवंय ?

चकोर: खरं शोधणाऱ्याला जिथं कधीच पोचता येत नाही असं खरं !

पल्लवी: म्हणूनच तर, खरं तर, ’ खरं ’ महत्त्वाचं असतं ! आणि कुणीही अंदाजानं वागणं वाईट, असंच आपलं मत असायला नको का ?

चकोर: तेही बरोबर आहे म्हणा !

आलोक: पटलं तर मग !

कामिनी: ’ खरं ’ त्याला जरा उशिरा पटतं ! आता हेच पहा नं -- ( नजरेत राग -- ) ही दोघं इथं बसली आहेत – ( आलोकना -- ) तुम्ही तिथं उभे आहात -- तिथंच थांबा -- ( चकोर आणि पल्लवी प्रेक्षकसन्मुख आणि आलोक पाठमोरे. कामिनी जणू मुद्दाम उठते आणि येऊन आलोकना आलिंगन दिल्याच्या पोझमधे उभी राहते -- हात आलोकांच्या पाठीवर घेते. ) अशी जरी मी येऊन उभी राहिले तरी काही नाही -- मन स्वच्छ पाहिजे -- ( हातांच्या बोटांनी ठाकूरांच्या पाठीवर उत्तेजक हालचाली करते. त्या अर्थात पल्लवी, चकोर यांना दिसत नाहीत. आलोकना -- ) आहे ना हे मनात काही नसणं ?

आलोक: ( बाजूला होत -- ) प्रश्नच नाही -- ( कामिनीचं वागणं ही आपल्या वागण्याला प्रतिक्रिया आहे, हे ओळखून पल्लवी उठून बाजूला जाते. )

कामिनी: आणि मघाशी तुम्ही म्हणालात तसं -- मनात काही असतं तर सगळ्यांच्या समोर वागूच शकले नसते मी अशी --

आलोक: वन्हि तो चेतवावा रे -- चेतवीताचि चेततो -- हे कुणाचं आहे ?

चकोर: हे असलं सगळं रामदासांचं असतं -- ब्रम्हचारी होते ते -- प्रयत्नपूर्वक वागल्यावर काहीही कसं साध्य होऊ शकतं, ते सांगायचे ते --

आलोक: पण यांनी ( कामिनीकडे निर्देश. ) खोटं पाडलं ते ! मनातच नसल्यावर -- खरंच -- लव्हली ! मनातच काही ठेवायचं नाही ही आयडिया खरोखर अव्दितीय आहे --

चकोर: युनिक म्हणा नं मग !

आलोक: तेच ! खरोखर !

चकोर: एखाद्या निरुपयोगी गोष्टीनं एवढं कुणी उल्हसित होत नाही -- बहुतेक उपयोगी असावी ती आयडिया –

तरी मी उल्हसित म्हटलंय -- उत्तेजित म्हटलेलं नाही --

आलोक: भाषेवर खरोखर तुमचं प्रभुत्वच आहे -- शब्दांचा वापर करेक्ट अगदी --

चकोर: शब्द बापुडे पोकळ वारा -- हे तुकारामांचं आहे -- ते ब्रम्हचारी नव्हते -- संसारी होते --

आलोक: तुम्हाला खरोखर हे सगळं माहीत आहे की कुणाच्याही नावावर काहीही खपवताय तुम्ही ? माझा काही एवढा अभ्यास नाही --

चकोर: अहो तुम्ही तर कुलगुरू ! तुमचा अभ्यास नाही ?

आलोक: नाही, खरंच ! मनात नसलं तरी मलाच उलट दबल्यासारखं झालं -- हिच्यासमोर ! ( पल्लवीकडे निर्देश.)

पल्लवी: असं, चारचौघांत, मिनिटभरात काही होऊही शकत नाही --

चकोर: आणि मला काय वाटलं, ते मी बोलूच शकत नाही ! मन अस्वच्छ आहे माझं !

कामिनी: ( आलोकना -- ) आलं ना लक्षात -- हे असं आहे सगळं -- निष्कारण छळ नुसता !

पल्लवी: ( कामिनीला -- ) जाऊं द्या -- तुमचं घर पाहू नं जरा --

कामिनी: हो, चला नं -- ( आलोकना -- ) येताय ?

आलोक: नाही, या तुम्ही. ( त्या दोघी जातात. चकोरला -- ) त्यांच्या मनात काही नाही, हे त्यांनी कृतीनं दाखवलं तसं तुमच्या मनात राग आहे, हे तुम्ही कृतीनं का दाखवलं नाही ?

चकोर: म्हणजे काय उठून मुसकटात द्यायची एक ठेवून का काय ! आणि कशासाठी ? तुम्ही सगळे चांगले हे सिध्द झालेलं असताना ! उगीचच तमाशा करायचा ?

आलोक: ते आहे म्हणा ! पण सगळीकडेच अशी विचारपूर्वक वागण्याची पध्दत उपयोगी पडत नाही असं मला वाटतं -- ठीक आहे -- पण तुमचा प्रॉब्लेम आलाय माझ्या लक्षात --

चकोर: कसला प्रॉब्लेम ?

आलोक: हेच -- सेक्सला ' शी घाण ' म्हणणं !

चकोर: छे, छे, त्यामुळं आमच्यात असा काहीच प्रॉब्लेम नाहीय -- आम्हाला तशी मजा येते -- त्यात तसा प्रॉब्लेम नाही -- सेक्सबद्दलची तशी पूर्ण किळस नाहीय ती ! आणि हे मला माहीत असल्यामुळंच मला ती किळस खोटी वाटते ! आमचंही सगळं बिघडलेलं असतं तर मग तिला खरंच किळस वाटते याच्यावर माझा विश्वास बसला असता !

आलोक: म्हणजे, तुमच्यात सगळं चांगलं आहे, हाच खरा प्रॉब्लेम आहे !

चकोर: ती किळस मला खोटी वाटणं, हा ! ( त्या दोघी एकीकडून येतात आणि दुसरीकडे जातात. )

आलोक: माझ्या एकूण लक्षात आलेलं एक सांगतो -- जगणं म्हणजे मनाचं खरचटत व्यग्र असणं -- मग विषय कुठलाही असो -- अमुक घडावं, अमुक टिकावं, तमुक संपावं आणि ढमूक घडू नये -- या चार प्रकारांत हे खरचटणं सतत चालू असतं -- आणि पाचवं म्हणजे हे खरचटणं थांबेल की काय ही या चारही प्रकारांत कॉमन असणारी भीती ! कारण ते थांबणं म्हणजे जगणंच थांबणं ! बस् ! जगण्याचा सारांश हा एवढाच ! ( त्या दोघी येतात. आलोक डबल सोफ्यावर बसलेले -- त्यांच्या शेजारी कामिनी बसते. चकोर सिंगल सोफ्यावर. पल्लवी दुसऱ्या सिंगल सोफ्यावर बसते. )

चकोरचे मन : एकूणात मन खरचटत असतं हाच सारांश --

पल्लवी: मस्त आहे घर तुमचं !

कामिनी: अहो, हे तर काहीच नाही -- मी आज जयकुमारकडे गेले होते ना, तर, तो तर एकटाच राहात असूनसुध्दा कसलं ' पॉश ' ठेवलंय त्यानं घर !

चकोर: मला असले लोक बनावट वाटतात !

कामिनी: दृष्टी तशी सृष्टी !

आलोक: ( कामिनीला -- ) तुमच्या तुमच्यातले टोमणे जाऊं देत पण मोजकंच आणि समर्पक बोलता तुम्ही !

कामिनी: ( पल्लवीला -- ) तुम्ही एका कॉलेजात होता तर तेव्हा कसा होता हा ? ( चकोरकडे निर्देश. )

पल्लवी: चांगलाच होता !

कामिनी: मित्रमैत्रिणी भरपूर असतील !

पल्लवी: मित्र कमी, मैत्रिणी जास्त ! मीही होते त्यांतली एक ! मजा यायची ! चावट ज्योक्स सांगायचा तो आम्हाला !

कामिनी: शी ! आणि सांगताय हे तुम्ही ! !

पल्लवी अहो काळ असतो तो !

कामिनी: काळबीळ काही नाही -- काय बदल झालाय याच्यात आता तरी ?

चकोर: ( पल्लवीला -- ) ए, काहीतरीच काय सांगतेस ! आलोकना काय वाटेल !

आलोक: माझ्या अंदाजांत फारशी नवीन भर पडतेय, असं नका समजू तुम्ही !

पल्लवी: ते तसले बुरसट विचारांचे नाहीत ! फ्री आहेत ! तसले असते तर ऊठसूठ प्रत्येकाला ठोसे लगावत बसले असते ते ! पण लोक त्याला वेडेपणा म्हणतील, हे कळतं त्यांना !

आलोक: माझ्याकडे बॉक्सिंगची कला असून बऱ्याच वेळा ती व्यक्त न होता पडून राहते ! मला भीती एवढीच आहे की एकदम ती भरमसाट व्यक्त होऊ नये म्हणजे झालं !

कामिनी: ( पल्लवीला -- ) अजूनही तुम्हाला ते खटकत नाही -- तुम्ही सहज सांगताय !

पल्लवी: खटकायचं काय त्यात ! लांबून तर सांगायचा तो ज्योक्स !

कामिनी : शी !

चकोर: हेल्दी फ्रेंडशिप म्हणतात त्याला ! ( पल्लवीला -- ) जाऊं दे -- दुसरं काही बोलू --

आलोक: म्हणजे दोनापैकी एक निरागस कमी झाला -- आपलं, झाली !

कामिनी: ( आलोकांच्या मांडीवर हात ठेवून -- ) तसं नाही हो -- चेष्टा नका करू -- माझा स्वभाव जरा वेगळा आहे इतकंच -- ( हात तसाच -- सगळे निरनिराळ्या प्रकारे अस्वस्थ. )

पल्लवी: आल्यावर करता स्वैपाक वगैरे ?

कामिनी: हो ना ! आमचं खरं जेवण रात्रीचंच ! रूटीन झालं पण आता ते !

पल्लवी: चकोर आणतो का भाजी वगैरे ?

कामिनी: हा कसला आणतोय हो भाजी -- ( असं म्हणताना हात उचललेला -- ) भाजी, दूध, किराणामाल -- हे सगळं मीच बघायचं ! ( पुन्हा हात तिथेच -- )

पल्लवी: अशी नका सवय लावू त्याला -- हळूहळू स्त्रीमुक्ती आणा जरा घरात -- निदान आठपंधरा दिवसातनं घराची स्वच्छता तरी करायला लावा -- पंखे कोण पुसतं ?

कामिनी: ते मात्र तो करतो -- ( रडवेली होत -- ) पण माझी काही तक्रार नाही...काही तक्रार नाही माझी...( रडू लागते...) खूप चांगला आहे तो ...

चकोर: ए, काय झालं ?

पल्लवी: ( उठत -- ) काय झालं हो ? ( कामिनी हमसून रडत एकदम आलोकांच्या गळ्यात पडते ... )

कामिनी: मी जयकुमारकडे गेले होते पण माझी कसलीही चूक झालेली नाही ... तसं काहीच नाही ... आणि तरीही चकोर...उगीचच...

आलोक: ( चकोरला -- ) मग काय हो ? कशाला... उगीचच...?

पल्लवी: ( जरा खोचकपणे -- ) तेच नं -- कशाला !

आलोक: ठीक आहे ...शांत व्हा तुम्ही ...( चकोर दोन्ही हातांत डोकं धरून, मान खाली घालून बसलेला. पल्लवी जाऊन चकोरच्या पाठीवर हात ठेवून उभी......आलोक आता कामिनीच्या डोक्यावर हात ठेवून पाहताहेत चकोर-पल्लवीकडे ... तसंच -- कामिनीला -- ) शांत व्हा तुम्ही ...हं ...आलोच हं मी ... ( तिला बाजूला करून उभे राहतात...)

कामिनीचे मन : चकोरचं हे असलं सेक्समधलं हावरट वागणं बघून वैतागत होते मी -- त्यामुळंच याला ’ शी--घाण ’ म्हणायला लागले ! -- पण मी कुठे मुक्त होते या मोहातनं ? आणि एका बाजूला शी-घाण म्हटल्यावर माझ्या हातून उघड चूक होणं, अजिबातच चालणार नव्हतं ! --

आलोक : आता माझ्या अंदाजांच्या साखळीची एक पूर्ण गोष्ट होतेय...नक्कीच...( पल्लवी अजूनही तशीच उभी...पाहतेय...चकोरही पाहू लागलेला...) आता माझ्या कलेचा उपयोग करायची वेळ आलीय चकोर.....( ते हाताचा ठोसा करून चकोरच्या दिशेने येतायत, हे पाहून पल्लवी मधे येते...)

पल्लवी: काय आहे ? काय चाललंय हे ? कशासाठी ?

आलोक: नुसतं ( गुद्दा दाखवत -- ) असं टच करतो तिथं -- तोंडावर -- किमान दोन दात तरी पडतील --

पल्लवी: का ? कशासाठी ? तुमच्या एखाद्या तात्पुरत्या संशयासाठी कायमचं नुकसान करायचं नाही कुणाचं -- ( चकोर जरा घाबरलेला ...)

आलोक: दोन दात तरी पाडावेच लागतील आता --

पल्लवी: ( मधे येत -- ) नाही, आधी माझे दात पाडा, मग त्याचे --( कामिनी सावरते, डोळे पुसते, पाहते. मग केस मागे बांधण्यासाठी दोन्ही हात उंच मागे नेते ...)

कामिनी: ( तसंच -- ) काय झालं आलोक ? -- जाऊं द्या -- मी करतेय ना विनंती -- ( चकोर काही क्षण चकितपणे पाहतो. नंतर -- )

चकोर : ( गडबडीत -- ) जाऊ द्या आलोक, आता बास झालं -- याच्यावर आता सोल्यूशनच -- आपलं -- तोडगाच काढू या आता -- मलाही याचा खूप त्रास व्हायला लागलाय आता --

आलोक : कसला तोडगा ?

चकोर : तडजोडच करून टाकू आता -- आपण एकमेकांच्या नादी लागायचं नाही -- बास --

आलोक : असं का !

चकोर : मला वाटतं मनाचा हा -- उलटंसुलटं वागायचा -- हा सगळा गोंधळच नष्ट करून टाकावा -- कसं वागायला पाहिजे हे एक वेगळं आणि वागणं दुसरंच -- असं नकोच --

आलोक : फारच छान ! कसं काय जमवणार हे ?

चकोर : मी तोच विचार करतोय -- ( डोक्याला हात लावून बसतो. )

कामिनी : मस्त वाटतं, उपाय सांगितले की ! ( चकोरला -- ) सांग, सांग !

पल्लवी: आचरणात आणले पाहिजेत पण !

आलोक : ( चकोरला -- ) काय सुचतंय का काही ? कधी सुचणार ? बी फास्ट !

चकोर : विचाराला जरा वेळ तर लागणारच, पण सुचेल -- लौकरच -- ( दोन क्षण जातात. मग -- ) मला जरा मदत लागेल -- कामिनीला तर हा विषयच आवडत नाही --

पल्लवी : मी आहे ना -- मी करते मदत -- ( ती त्याच्या जवळ येते. बसते. )

चकोर : हं, तर प्रश्न असा आहे की -- ( ती दोघं एकमेकांशी बोलत राहतात... )

आलोक : हे काय चाललंय ?

चकोर : विचारविनिमय तर करतोय !

पल्लवी : विचारविनिमय !

कामिनी : शी !

आलोक : ( क्षणभर विचार करून कामिनीला -- ) तुमचं घर बघायचं राहिलंय मघाशी माझं -- चला बरं, बघू या -- बघता बघता आपणही करू काही विचारविनिमय ... बॉक्सिंगपेक्षा तेच बरं पडेल !

कामिनी : ( उत्साहानं -- ) हो, हो ! चला ना ! निरागसपणाचा दिवसच दिसतोय आज ! ( ती दोघं आत जाऊ लागतात. तेवढ्यात -- )

पल्लवी : थांबा ! काही नकोय विचारविनिमय !

चकोर : विचारच नाही करायचा ? मग करायचं तरी काय ?

पल्लवी : पण मग करू या का विचारविनिमय ?

आलोक : ( जरबेने -- ) ‘ थांबा ‘ म्हणालीस ना --

कामिनी : करू या, करू या -- सापडेल काहीतरी उपाय – आशावादी तर राहायलाच लागेल – खरंच – आता यावर नको वेगळे विचार –प्ली S S ज – फार तर आपापले करू या विचार – एकेकटे -- ( सगळे डोक्याला हात लावून, वेडेवाकडे गंभीर चेहरे करत विचार करत बसतात -- )

**समाप्त**

--- 000 ---

**दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीला इथे दिलेले चॅटिंगनंतरचे स्वप्नदृश्य किंवा हे खालील दृश्य यांतले एक घ्यावे.**

( जयकुमारचे घर. जयकुमार -- २७ -- आणि कामिनी -- २५ -- आत येतात. कामिनीचा पोषाख साधा. चष्मा. पण जरा सुंदरच. तो किल्ली ठेवतो. )

जयकुमार: या, बसा. खूप आनंद वाटला. आज तुम्ही आलात. मी आज ठरवलंच होतं की रिक्वेस्ट करायचीच आज तुम्हाला.

कामिनी : अहो, रिक्वेस्ट कशाला हवीय अगदी ?

जयकुमार: तसं नाही -- एक वाटत होतं मला की बास, जाता जाता तुम्ही माझ्या घरी यावं -- नुसतं कॉफी प्यायला -- बास -- पण काय हो, तुमचे पतिदेव वकील आहेत -- एखादी केसबीस नाही ना करायचे माझ्यावर -- तुम्ही इकडे आल्याच्या रागामुळं ?

कामिनी : छे हो, राग कशासाठी ? उलट किती चांगले आहात तुम्ही वागायला -- आपण जेव्हा इकडे येण्यासाठी टॅक्सीत बसत होतो, तेव्हा, एक लक्षात आलं का तुमच्या, पाठक चकित झाल्यासारखा बघत होता --

जयकुमार: या लोकांना नं लगेच भानगडच वाटते काहीतरी -- माझं लक्ष नव्हतं -- पण म्हणूनच खरं तर मी खूप जपून वागतो -- कामापुरतं बोलतो -- उगीचच नाही ते विचार करतात -- अहो, आणि ते विचार बोलतातसुध्दा एकमेकांत !

कामिनी : सारखे सेक्सचे विचार डोक्यात ! शी !

जयकुमार: आपण कधीकधी हॉटेलात जातो कॉफी प्यायला -- पण एकदा तुम्ही घरी यावं अशी इच्छा होती --

कामिनी : आलेय ना मग म्हणून तर !

जयकुमार: रिक्वेस्ट का म्हटलं -- आपुलकीचा हक्क नाही असं नाही, पण किती झालं तरी तुम्ही एक स्त्री आहात -- तुम्हाला काय वाटेल असाही प्रश्न होता मनात -- उगीचच असलेली रिलेशनशिप बिघडू नये असंही वाटत होतं --

कामिनी : अहो, आपण सारखे सेक्स या विषयात नसतो म्हणून तर तयार झाली ही रिलेशनशिप -- पण इतका विचार करत होता तुम्ही ?

जयकुमार: तुम्हाला तसं महत्त्वच आहे ना माझ्या मनात --

कामिनी : कमाल आहे बाई ! माणसानं साधं, सरळ असावं, पण किती ! एवढी नका काही काळजी करू ! मला काहीही खटकलेलं नाही !

जयकुमार: नाही, आता नाही काही प्रश्न -- सुरुवातीला वाटलं जरा -- अर्थात् माझ्या मनात तसलं काही असतं तर आपली अशी मैत्री झालीच नसती म्हणा --

कामिनी : प्रश्नच नाही -- ( क्षणभरानं -- ) छान आहे घर !

जयकुमार: मला स्वच्छतेची, टापटिपीची आवड आहे !

कामिनी : तुम्ही एकटेच राहात असूनही काय मस्त ठेवलंय घर ! घरचे कुणी येतात की नाही ?

जयकुमार: उत्तरप्रदेशात असतात सगळे -- कधीकधी येतात --

कामिनी : हं हं -- ( या दृश्यात सुरुवातीला जयकुमार कामिनीपासून जरा अंतर राखून पण हळूहळू बोलण्याच्या ओघात जवळीक साधत जातो.) दुसऱ्या कुणी घरी बोलावलं असतं तर मी गेले नसते --

जयकुमार: माहिती आहे मला -- ऑफिसातल्या दुसऱ्या कुणाबरोबर तुम्ही कॉफी प्यायला हॉटेलात तरी कुठे जाता ? फक्त मलाच ती संधी मिळते -- कधीकधी का असे ना --

कामिनी : अहो, रोज कसं दिसेल ते ! ?

जयकुमार: ते तर आहेच म्हणा !

कामिनी : बायका असो -- पुरुष असो – सगळ्यांच्या डोक्यांत सारखे तेच विचार असतात -- किळस येते अगदी !

जयकुमार: त्यांचं तसं नसतं तर मग रोज चाललं असतं ! मग कसं दिसेल वगैरे प्रश्न आला नसता !

कामिनी : तसंच काही नाही अगदी !

जयकुमार: पण बरोबरच आहे ना तुमचं ! म्हणजे आपलं ! मलाही ते आवडत नाही ! सेक्स इज नॉट ऑल ! तुमचं माईंड खूप साधं, स्वच्छ आहे -- त्यामुळं तुम्ही खूप इनोसंट आणि फ्रेश दिसता ! निरागस आणि प्रसन्न !

कामिनी : समोरच्या व्यक्तीबद्दल संशय किंवा कुठलेही वाईट विचार नसले ना आपल्या मनात की आपण राहू शकतो तसे !

जयकुमार: पण याचं श्रेय मी तुम्हालाच देऊ इच्छितो ! मी समोर असल्यामुळे -- असं नको.

कामिनी : दोन्ही असतं हो !

जयकुमार: किती सोपं, छान करता तुम्ही सगळं !

कामिनी : मी तुमच्याबरोबर टॅक्सीतून आले हा आता उद्या एक चर्चेचा विषय होईल पाठक वगैरेंना --

जयकुमार: आपण आपल्या स्वच्छ मनानं जगत राह्यचं हाच याच्यावर उपाय -- त्यांच्यांत दुरुस्त्या करत बसणं -- त्यांना सुधारत बसणं शक्यच नाही -- आलोच हं -- बसा -- ( आत जातो.)

कामिनी : ( फुलझाडं पाहून -- ) फुलझाडं छान आहेत !

जयकुमार: ( ट्रे मधून पाण्याचे ग्लास आणत -- ) हो, मला खूप आवड आहे फुलझाडांची !

कामिनी : विशेष आहे -- एकटे असून एवढं सगळं -- ( ती पाणी घेते. तो ट्रे ठेवतो. स्वत: दुसऱ्या ग्लासातले थोडे पाणी पिऊन ग्लास ठेवतो.)

जयकुमार: आता आपल्या मनात काही नसलं तरी ऑफीसात असं मोकळेपणानं बोलता येत नाही -- खूप बरं वाटलं -- विशेषत: म्हणजे अगदी खरं बोलायचं झालं तर तुमचा माझ्यावरचा विश्वास ! त्याचा खूप आनंद वाटला ! नाहीतर आलाच नसतात तुम्ही !

कामिनी : अहो, कोणता पुरुष कसा बघतोय ते लगेच कळतं ! सारखे सेक्सच्या विचारात असलेले लोक पाहिले की किळस येते मला !

जयकुमार: अहो, तुम्ही तर खूप सौम्य बोलताय -- बरं का -- आपल्याच ऑफिसातला एक माणूस मी असं बोलताना ऐकलाय की त्याला एखादी व्यक्ती -- म्हणजे स्त्री -- आवडली ना की तो अशी कल्पना करतो की -- जाऊं दे --

कामिनी : सांगा हो --

जयकुमार: ती व्यक्ती अंघोळ करताना कशी दिसेल अशी --

कामिनी : शी !

जयकुमार: आता याला विकृती नाही तर काय म्हणायचं ते सांगा !

कामिनी : विकृतीपेक्षा घाणेरडा शब्द मलाही आठवत नाही --

जयकुमार: पण माझं तसं नाही -- माझ्या मनात तुमची प्रतिमा आहे ती पूर्ण कपड्यांत आणि फ्रेश ! तुमची आठवण झाली तरी फ्रेश वाटतं ! आलोच हं ! जरा कॉफीचं बघतो -- ( जातो. )

कामिनी : मी करू का ?

जयकुमार: नाही नाही -- झालीच ! ( बाहेर येतो. ) एक मिनिटात होईल ! तुम्हाला राग नाही ना आला ?

कामिनी : कसला ?

जयकुमार: त्या माणसाचं उदाहरण सांगितलं ते ?

कामिनी : अहो, तसलीच खूप असतात माणसं !

जयकुमार: मला खरं तर वेगळंच विचारायचं होतं !

कामिनी : काय ?

जयकुमार: ते मला तुमची नुसती आठवण झाली तरी फ्रेश वाटतं त्याचा ? त्याचा राग नाही ना आला ? आलोच -- झाली असेल -- ( आत जातो. आतूनच --) एकच मिनिट हं --

कामिनी : कशाला त्रास घेतलात -- उगीचच -- ( तो ट्रे मधून दोन कपबश्या घेऊन येतो. देतोघेतो.)

जयकुमार: तुम्हाला माझ्या कुठल्याही बोलण्याचा किंवा कसलाही राग आला तर फार वाईट वाटेल मला -- दु:खच होईल --

कामिनी : नाही हो -- तुमच्याकडून होणारच नाही असं काही -- आणि फ्रेश वाटण्यात काय वाईट आहे ?

जयकुमार: तुमच्यासारख्या व्यक्ती मुळातच खूप कमी असतात -- स्त्रीची प्रतिष्ठा मी महत्त्वाची मानतो --

कामिनी : ते तर आहेच हो -- त्याशिवाय का मी एवढं बोलते तुमच्याशी --

जयकुमार: ते तर आहेच -- कशी आहे कॉफी ?

कामिनी : छान ! बोलण्याच्या नादात ते सांगायचंच राहिलं !

जयकुमार: राहू द्या हो -- चेहऱ्यावर दिसतंच की ! वाईट असती तर चेहरा बदलला असता ! ( दोघेही हसतात. )

कामिनी : सतत एकटं राह्यचं म्हणजे कंटाळा येत असेल नाही ? कसं काय जमतं ?

जयकुमार: आठवणी !

कामिनी : अं ?

जयकुमार: घरची माणसं, नातेवाईक, मित्र, आवडल्या व्यक्ती !

कामिनी : आता मी इथं आलेलं कुणी बघितलं असलं तर विचारतील तुम्हाला -- कोण म्हणून !?

जयकुमार: मी जास्त बोलत नाही कुणाशी -- आणि विचारलं तर सांगीन की तुम्ही आमच्या वहिनींच्या नातेवाईक आहात म्हणून ! याच्या पुढं मग कुणी विचारत नाही --

कामिनी : हं -- ( कॉफी पिऊन संपते. ती कपबशी ट्रे मध्ये ठेवते. त्याचीही संपते ते पाहून -- ) आणा, मी विसळते.

जयकुमार: नो, नो ! एक मिनिट ! ( तो ट्रे आत ठेवून येतो.) आता माझं खरं समाधान झालं ! माझ्या हातची कॉफी तुम्ही प्यालात आणि तुम्हाला ती आवडली !

कामिनी : खोटं नाही, खरंच छान झाली होती कॉफी !

जयकुमार: मिस्टर तुमचे संशयी वगैरे नाहीयत ना ?

कामिनी : पण मला कसली भीती आहे ? ज्यांच्या डोक्यांत सारखे हेच विचार असतात त्यांना तो त्रास ! पण मनात संशय येण्याचा त्रास मात्र मलाही होतो हं ! त्याच्याबद्दलचा !

जयकुमार: तुमचं बोलणं मला तितकंसं कळलं नाही -- पण माझा मला तरी आत्मविश्वास आहे की अगदी लायडिटेक्टरच्या साहाय्यानं तपासलं ना तरी माझ्या मनात तसलं काही सापडणार नाही --

संध्या : अहो, लायडिटेक्टर जाऊं द्या -- माणसं स्वत:लाच लायडिटेक्टर समजतात आणि दुसऱ्याची तपासणी करतात -- ( हसून -- ) मीही अपवाद नाही हं याला --

जयकुमार: मला खरं नाही वाटत --

संध्या : लग्न झाल्यावर कळेल तुम्हाला ! --

जयकुमार: नुसतं आपण साधं असून काहीच उपयोग नाही -- बाकीचे लोक जर साधे नसले तर ते लक्षात ठेवूनच वागावं लागतं -- सरळ आपल्या साधेपणानं वागून चालतच नाही -- आपण कितीही साधे असलो तरी आपण वागायचं कसं हे दुसरे लोकच ठरवतात --

कामिनी : म्हणजे ?

जयकुमार: म्हणजे समजा तुमचा हात हातात घेऊन किंवा सहज असा तुम्हाला स्पर्श करून बोलावं असं मला वाटलं आणि समजा तुमचंही काही म्हणणं नाही, तरीही, ' कुणी बघितलं तर ' हाच विचार प्रबळ होतो -- हे अर्थात मी स्पर्श न करता नुसतं बोलतोय हं --

कामिनी : हो -- तसं आहे खरं --

जयकुमार: दुसऱ्या लोकांच्या गुंतागुंतीच्या मनांनीच आपल्याला जगावं लागतं -- आपापल्या स्वच्छ मनांनी जगताच येत नाही कारण सगळीकडे राज्य त्यांचंच असतं --

कामिनी : खरंच ! प्रश्नच असतो हा एक !

जयकुमार: आता ऑफिसात असताना जातो आपण कधीतरी कॉफी प्यायला पण पाचदहा मिनिटांत हे असं बोलता येत नाही -- खूप बरं वाटलं --

कामिनी : अहो, मलाही छान वाटलं -- नुसतं तुम्हालाच नाही काही.

जयकुमार: आपुलकी वाटणं, प्रेम वाटणं म्हणजे लगेच काही सेक्स नव्हे -- आपल्याकडे नं, लोकांना नीतीची दडपणं फार घ्यावी लागतात, त्यामुळं असे घोटाळे होत असतील --

कामिनी : छान बोलता तुम्ही !

जयकुमार: खरं आहे की नाही सांगा !

कामिनी : अगदी ! मलाही हेच वाटायचं पण मला असं करेक्ट वाक्य सुचलं नव्हतं -- आणि गंमत सांगते, तुम्हाला सुचलंय नं, तर ते ऐकूनही रिलॅक्स झाल्यासारखं वाटतं --

जयकुमार: आनंद वाटला -- ( तिच्या जवळ बसत -- ) तुमचा आवाज, तुमच्या हालचाली, तुमचे लुक्स -- सगळंच -- नुसता फ्रेशपणा आणि आनंद ! ( दोघेही एकमेकांकडे बघतायत -- क्षणभरानं -- ) असं असावं माणसानं -- फ्रेश आणि इनोसंट -- प्रसन्न आणि निरागस !

कामिनी : असं स्वच्छ बोलता आलं पाहिजे -- सारखं सेक्सच्या विचारात न अडकता --

जयकुमार: ( तिचा हात हातात घेऊन -- ) सौंदर्य ही गोष्ट ना, शरीराची नसतेच -- मनाची असते --

कामिनी : तुम्ही असं सहज हात हातात घेऊन बोललात नं -- हे सगळं इतकं छान, मोकळं -- अशक्यच आहे हे सगळं आणखी कुठंही --

जयकुमार: स्पर्शातनंसुध्दा मन कळतं -- दृष्टीतनं कळतं ते वेगळं आणि हे स्पर्शातनं कळणं वेगळं -- दोन्ही एकच पण अनुभव वेगळे --

कामिनी : तुम्हाला काहीतरी छान बोलायचंय पण मघासारखं नेमकं वाक्य सुचत नाहीय -- हेही छान वाटतंय --

जयकुमार: तुम्ही अत्तर -- सेंट तर काही लावत नाही पण तुमच्या अस्तित्वातच एक सुगंध आहे -- त्यानं भारून जातं तुमच्या अवतीभोवतीचं वातावरण --

कामिनी : हे जरा जास्तच होतंय असं नाही वाटत ? मला खरं वाटायची मर्यादा ओलांडली जातीय आता --

जयकुमार : नाही, नाही -- अहो आपली मनं जरी एकसारखी असली तरी वेगवेगळीच असणार नं ती -- एकच नसणार ती --

कामिनी : हं -- हा आहे खरा प्रॉब्लेम -- एकाच वेळी दोन मनांना एकच सत्य -- असं कसं होणार ?

जयकुमार: तसं झालं तर भांडणंच बंद होतील सगळी -- पण एक लक्षात घ्या -- वेगवेगळं असण्यातलं घर्षणही एक नशा देणारं, धुंदी देणारं अप्रूप असतं --

कामिनी : एकसारखं असणं आणि शिवाय घर्षण असणं !

जयकुमार: तुमच्या मिस्टरांची काय मतं आहेत अशा बाबतीत ? म्हणजे प्रेम असणं आणि वेगळेपणा असणं ?

कामिनी : अहो आमचं बोलणंच होत नाही असं फारसं -- वेगळेपणा वाढला की प्रेम कमी होतंय का काय असंच वाटत राहतं -- ( हात सोडवून घेत -- ) आता जरा वेळ हात सोडून बोलू या ? !

जयकुमार: ( पुन्हा हात हातात घेत -- ) असूं द्या हो -- तुम्ही थोडंच वारंवार येणाराय ? ! येत चला पण अधूनमधून -- छान वाटतं !

कामिनी : हं --

जयकुमार: आता आपण जेव्हाजेव्हा कॉफी प्याला जाऊ तेव्हा अधिक मोकळेपणानं, अधिक आत्मविश्वासानं आणि मुख्य म्हणजे अधिक निष्पापपणानं बोलता येईल आपल्याला --

कामिनी : मराठी छान आहे तुमचं ! --

जयकुमार: अहो भाषा सगळयांना माहीत असते -- नवीन काही नसतं त्यात -- फक्त मन त्या उंचीवर आणि त्या जिवंतपणात जाण्याचा प्रश्न असतो --

कामिनी : हेही मराठी छान !

जयकुमार: पण खरं आहे की नाही सांगा नं --

कामिनी : हो, खरं आहे नं !

जयकुमार: ( तिचा हात कुरवाळत -- ) मनाची अशी अवस्था होऊच देत नाहीत बरेच लोक -- दबवून टाकतात --

कामिनी : कायद्यानं मी सज्ञान होऊन काही वर्षं होऊन गेली पण आज मी खरी सज्ञान झाले असं मला वाटतं --

जयकुमार: आणि याला माझा हातभार लागला !

कामिनी : माझा हातभार तुमच्या हातात घेतल्यानं ! ( दोघेही हसतात.)

जयकुमार : हेच आपलं बोलणं -- बसणं दुसऱ्या कुणी पाहिलं तर त्याला किंवा तिला काय वाटेल सांगा बर --

कामिनी : अहो सेक्सच वाटणार हा त्यांना -- वेगळं काही कळूच शकणार नाही असल्या लोकांना --

जयकुमार: नुसता सेक्स नाही -- मनात काही नसण्याच्या आणि सभ्यपणाच्या लेव्हलवर सेक्स चाललाय असं वाटेल त्यांना !

कामिनी : हेही छान मराठी !

जयकुमार: तुम्ही जेव्हा माझ्या मराठीचं कौतूक करता तेव्हा ते माझंही आहे असं समजू ना मी ?

कामिनी : अहो तुमचंही नव्हे, तुमचंच !

जयकुमार: ( तिच्या हाताचं लांबूनच चुंबन घेऊन -- ) छान !

कामिनी : शी ! मला किळस येते अगदी ! ( तो घाबरून एकदम हात सोडून देतो. ) याला जे सेक्स समजतील त्यांची !

जयकुमार: ( पुन्हा हात हातात घेत -- ) मग हरकत नाही ! घाबरलोच ना मी एकदम ! म्हटलं काय अचानक फरक पडला बुवा !

कामिनी : आपलं काही नाही हो ! त्यांचं बोलत होते !

जयकुमार: पण तुमचं ते सज्ञान होण्याचं काय बोललात तुम्ही ते मला कळलं नाही -- मला खूप उत्सुकता आहे ते समजून घेण्याबद्दल --

कामिनी : इतकं काही नाही हो -- पण हे अगदी प्रयोग करून पाहण्यासारखं ज्ञान आहे --

जयकुमार: तरी पण ?

कामिनी : ( उठत -- ) चला, आता निघते मी -- उशीर होईल -- तुमचा शब्द मला मोडायचा नव्हता म्हणून खरं तर मी आले -- आता ते उद्या कॉफीच्या वेळी बोलू --

जयकुमार: म्हणजे यात मला स्त्रीचा निर्दयीपणा तर जाणवतोच आहे पण शिवाय उद्याच्या कॉफीच्या वेळेपर्यंत हाच विचार माझ्या मनात घोळत राहिला पाहिजे असा एक प्रेमळ हुकूमही लक्षात येतोय माझ्या -- आणि मुख्य म्हणजे एक आश्वासन !

कामिनी : आश्वासन कसलं ? आणि एका वाक्यात एवढं गुंतागुंतीचं करायला कसं हो जमेल मला ?

जयकुमार: गुंतागुंत तुम्ही करताय की माझी होतेय याला महत्त्वच राहात नाही ना अशा वेळी -- पण मी तुमच्या प्रश्नाचं उत्तर लांबणीवर टाकत नाही -- ते आत्ताच देणं हे आजच्या दिवसावर कळस चढवण्यासारखं होणार आहे --

कामिनी : अय्या ! ( त्याचा हात हातात घेऊन -- ) सांगा नं मग !

जयकुमार: आश्वासन हे की अशा शुध्द मनानं खूप काही होऊ शकतं ! प्रश्नच येत नाही !

कामिनी : ( गडबडीनं -- ) ए, चला, मी निघते हं आता ! -- आणि माझ्या सज्ञान होण्याबद्दल सांगायचं राहिलं काय आता ? ' आश्वासन ' या शब्दाखाली तुम्हालाही तेच ज्ञान झालंय ! -- शुध्द मनानं खूप काही होऊ शकतं ! -- चला ! ( उठते. )

जयकुमार: ( उठत -- ) आता पुन्हा कधी ?

कामिनी : असंच कधीतरी --

जयकुमार: म्हणजे यापुढं छळच होणर माझा --

कामिनी : कसला ?

जयकुमार: हेच ! विचारात तडफडत राहण्याचा ! म्हणजे शुध्द मनानं निर्दयीपणाचा अनुभव घेणं आणि विचारांत तडफडत राहणं !

कामिनी : एवढं गुंतागुंतीचं खरंच काही नाही जमत हो मला ! पण जाऊ द्या, चला ! खूप झाला पल्ला ! आज पुरे !

जयकुमार: ( तिचा हात हातात घेऊन --) छान वाटलं ! खरंच ! ( इथे हे दृश्य संपते. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा तेच चकोरचे घर. चकोर घरच्या कपड्यांत वर्तमानपत्र चाळत बसलेला -- .. .. ..

--- 000 ---

**काही शक्यता –**

(1) यातला पहिला अंक एक एकांकिका म्हणून सादर होऊ शकतो.

(2) दुसऱ्या अंकातले चॅटिंग, स्वप्नदृश्य वा जयदीप दृश्य वगळून हा एक दीर्घांक म्हणूनही सादर होऊ शकतो.

(3) अन्यथा, चॅटिंग दृश्यासह वा त्याशिवाय आणि स्वप्नदृश्य वा जयादीप दृश्य यांतले हवे ते घेऊन हे एक पूर्ण दोन अंकी नाटक म्हणून इथे दिलेलेच आहे.

(4) गरजेप्रमाणे थोडेफार संपादन करता येईल.

--- 000 ---

**सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता:- चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर, वीर सावरकर मार्ग,
सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११ ००९.
मोबाइल : ९३७१००५७७३.
ईमेल : champrade@gmail.com
वेबसाईट : www.champralekhan.com